अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २७ ऑगस्ट २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३२७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## आयटी कंपन्या, उद्योग न येण्यास महापालिकेची कर प्रणाली कारणीभूत

### गिरीकर्णिका फाउंडेशनचा आरोप

✔ **सोलापूर** : महानगरपालिकेचे कर संकलन आणि गणना प्रणाली अत्यंत जुनी, कालबाह्य, घटनाबाह्य तथा मनमानी पद्धतीची आहे. यामुळेच सोलापूर शहरात आयटी कंपन्या आणि विविध उद्योग येत नाहीत. महापालिकेचा असा कारभार नागरिक आणि व्यापाऱ्यांच्या मुळावर असल्याचा आरोप गिरीकर्णिका फाउंडेशनच्या वतीने करण्यात आला आहे.

सोलापूर शहरातील कर पद्धत कर संकलन आणि गणना प्रणाली संदर्भातील माहिती या संघटनेकडून माहितीच्या अधिकाराखाली सविस्तर मागविण्यात आली होती. त्या आधारे महापालिकेची ही प्रक्रिया हीच याला कारणीभूत असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने केला आहे. ३६५ दिवसांची पाणीपट्टी आणि प्रत्यक्षात ६० दिवस पाणीपुरवठा या व इतर बाबींवरुन आय. टी. कंपन्या आणि मोठे उद्योगजक येथे गुंतवणूक करण्यासाठी येत नाहीत. या प्रणालीमुळे, सोलापूर शहरातील महापालिका कराच्या दरात इतर महानगरांपेक्षा खूपच तफावत दिसून येते. हे दर अत्यंत जास्त असल्याने, नवीन उद्योगधंदे सोलापूरमध्ये स्थापन होण्यास इच्छुक नसल्याचे संघटनेने म्हटले आहे.

# तुम्हाला इथे काय झक मारायला ठेवलेय का? अजितदादांनी सर्वांदेखत अधिकाऱ्यांना झापले

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा स्वभाव महाराष्ट्राला सर्वश्रुत आहे.प्रशासकीय आणि विकास कामात कुणी हलगर्जिपणा कुणी केला ते संबधित अधिकाऱ्याची चामडेच सोलून काढत असतात. त्यामुळे अजितदादांच्या दौऱ्यात अधिकाऱ्यांची भंबेरीच उडत असते. सोमवारी हाच अनुभव पुण्यात आला. जीएसटी भवनच्या इमारतीचे उद्घाटन करायला आलेल्या अजितदादांनी पीडब्ल्यूडीच्या अधिकाऱ्यांच्या कामाचे वाभाडे काढले आहे. अधिकाऱ्यांनी काही कामे व्यवस्थित केली नाही किंवा ती लवकर आवरण्यासाठी वरवर केली. ही बाब त्यांच्या नजरेतून सुटली नाही. त्यांनी थेट अधिकाऱ्यांना बोलावून त्यांची कानउघडणी केली. तुम्हाला इथे काय झक मारायला ठेवलंय का? अशा शब्दात संताप व्यक्त करून त्यांनी सर्वांदेखत अधिकाऱ्यांना झापले**

पवार हे त्यांच्या परखड स्वभावासाठी प्रसिद्ध आहेत. अनेकदा त्यांच्या सडेतोड शब्दात ते उत्तरे देत असतात. कामाच्या बाबतीत अजित पवार हे आग्रही असतात.

त्यात कुचराई करणा-यांना ते नेहमी धारेवर धरत असतात. पुण्यात अनेक बैठकांमध्ये त्यांनी अधिका-यांना चांगलेच झापले आहे. असाच एक प्रकार पुन्हा उघडकीस आला आहे.पुण्यातील जीएसटी भवनच्या इमारतीचे उद्घाटन पवार यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच वडगावशेरी मतदारसंघातील तीनशे कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन देखील पवारांच्या हस्ते झाले. उद्घाटनानंतर त्यांनी ते तेथील पाहणी करत होते.

यावेळी अधिकाऱ्यांनी काही कामे व्यवस्थित केली नाही किंवा ती लवकर आवरण्यासाठी वरवर केली. मात्र, ही बाब अजित पवार यांच्या नजरेतून सुटली नाहीत. त्यांनी थेट अधिका-याला बोलावत त्यांची कानउघडणी केली.

## पीडब्ल्यूडीच्या अधिकाऱ्यांच्या कामाचे काढले वाभाडे




### नेमके काय घडले?

अजित पवार इमारतीच्या उद्घाटनासाठी गाडीतून खाली उतरले. इमारतीकडे जाताना पहिल्याच पायरीला सिमेंट होते. ते सिमेंट व्यवस्थित साफ केलेले नव्हते. पवारांनी संबधित अधिकाऱ्याला विचारले हे असे का झालेय? त्यावर अधिकाऱ्याने ते काढायचे राहिले असे उत्तर दिले. अधिकाऱ्याच्या या उत्तरानंतर पवारांचा पारा चढला म्हणाले, हे मला काढायला ठेवले का? तुम्हाला माहित आहे ना मी बारीक बघतो..मग हे कशाला झक मारायला ठेवले का?

### एकदा नाही दोनदा झापले...

पुढे गेल्यानंतर इमारतीच्या आतील बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत ड्रेनेज चेंबर रस्त्याच्या मध्येच होते हे पाहून पवार पुन्हा एकदा चिडले आणि अशी छा चू गिरी करू नका अशा शब्दात तिथल्या अधिकाऱ्यांना झापले.


### मुख्यमंत्रीही भडकले

पळून गेलेल्या कंत्राटदारांना उचलून जेलमध्ये टाका, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गणेशोत्सवाच्या तोंडावर कोकणात जाणाऱ्या कोकणवासियांसाठी मुंबई गोवा महामार्गाच्या कामाची पाहणी करत आहेत. काम सोडून पळून गेलेल्या कंत्राटदारांना उचलून आणून जेलमध्ये टाका, मनुष्यबळाचा गुन्हा नोंदवा असे आदेश शिंदे यांनी रस्त्याची दुरावस्था पाहिल्यानंतर रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले. शिंदे यांनी रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांना फोनवरुन आदेश दिले. कंत्राटदारांवर ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करा, इथे माणसे मरत आहेत, त्याला जबाबदार कोण असा प्रश्न शिंदे यांनी केला.

## कोयत्याने हल्ला करून पसार झालेल्या दोघांना अटक

### गुन्हे शाखेची कारवाई

✔ सोलापूर-पुणे/प्रतिनिधी



भांडण सोडविणाऱ्या सहायक पोलीस निरीक्षकावर कोयत्याने वार करुन पसार झालेल्या सराईतांना गुन्हे शाखेने सोलापूर परिसरातून सोमवारी अटक केली. निहालसिंग मन्नूसिंग टाक (वय १८, रा. तुळजाभवानी वसाहत, हडपसर), राहुलसिंग उर्फ राहुल्या रवींद्रसिंग भोंड (वय १९, रा. हडपसर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

हडपसर भागातील ससाणेनगर परिसरात रविवारी दुपारी चारच्या सुमारास दोन दुचाकिस्वारांमध्ये वाद सुरू होते. त्यावेळी एका दुचाकिस्वाराच्या बाजूने आरोपी निहालसिंग आणि राहुलसिंग भांडण करत होते. आरोपींच्या हातात कोयता होता. त्यावेळी तेथून निघालेले सहायक पोलीस निरीक्षक रत्नदीप गायकवाड यांनी आरोपींना पाहिले.

गायकवाड यांनी भांडणात मध्यस्थी करून आरोपी निहालसिंग टाक याच्या हातातील कोयता काढून घेण्याचा प्रयत्न केला. झटापटीत टाकने कोयता फेकून मारल्याने गायकवाड यांच्या कपाळाला गंभीर दुखापत झाली. टाक आणि साथीदार भोंड पसार झाले.

### मरवडे टोल नाक्यावर केली कारवाई

पुण्यातून आदेश आल्यानंतर पुणे–सोलापूर हायवेवर सोलापूर ग्रामीण पोलीस दलाने सापळा लावला होता .वरवडे टोक नाकाजवळ नाकाबंदी करण्यात आली होती.सोमवारी पहाटेच्या सुमारास हे दोघे लक्झरीमध्ये बसले होते.ही गाडी मरवडे टोल नाक्यावर आल्यानंतर पोलिसांनी लक्झरीची तपासणी केली. त्यावेळी हे दोघेहीआत बसले होते. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले.ग्रामीण पोलीस दलाने पुण्याशी संपर्क साधून चर्चा केल्यानंतर या दोघांवर ५० पेक्षा जास्त गुन्हे दाखल झाल्याचे सांगण्यात आले.

## शेततळ्यात पडून १२ वर्षीय मुलीचा मृत्यू

✔ **सोलापूर** : शेततळ्यात पाय घसरून पडल्याने १२ वर्षीय मुलगी मरण पावली. ही घटना वळसंग (ता.द.सोलापूर) येथे सोमवारी उघडकीस आली. सोनाली रामचंद्र वाघमोडे (वय १२ रा. हालचिंचोळी ता.अक्कलकोट) असे त्या मुलीचे नाव आहे. सोमवारी सकाळी तिचा मृतदेह वळसंग येथील बसप्पा यांच्या शेतातील तळ्यात पाण्यावर तरंगताना आढळला. सोनाली ही रविवारी सायंकाळी आजोबा सोबत बसप्पा यांच्या शेतात गेली होती. मयत सोनालीच्या पश्चात आई आणि वडील असा परिवार आहे. हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

## करमाळा तालुक्यात मंकी फॉक्स आजाराची केवळ अफवा

### जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नवले यांची माहिती

✔ **सोलापूर** : करमाळा तालुक्यात कुठल्याही प्रकारचे मंकी फॉक्स आजाराचे रुग्ण नाही. केवळ चिकन गुनियाचे रुग्ण आढळून आल्याने तापाचे रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. मंकी फॉक्स आजाराची अफवा असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी सांगितले. जिल्ह्यात कोठेही मंकी पॉक्स'चे रुग्ण आढळलेले नाहीत, अशी माहिती त्यांनी दिली

करमाळा तालुक्यातील रिंधोरे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दीत तापाचे रुग्ण आढळल्याची तक्रार आली होती. पुणे व अहिल्या नगर सीमे लगतचा हा भाग येत असल्याने दोन्हीकडच्या लोकांची ये- जा असते. त्यामुळे जिल्हा आरोग्य विभागाने याची तात्काळ दखल घेतली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी रिंधोर आरोग्य केंद्र परिसरात भेट देऊन रुग्णांची प्रत्यक्ष तपासणी केली. यावेळी तालुका वैद्यकिय अधिकारी काटकर उपस्थित होते.

संबंधित रुग्णांना चिकुन गुनियाची लागण झाल्याचे दिसून आले. या रुग्णांमध्ये मंकी पॉक्सची कोणतीच लक्षणे नसल्याचा निर्वाळा त्यांनी दिला.

### खबरदारी घ्या, आजार टाळा

कोरोना महामारीच्या काळात म्हणजे सन २०२२ मध्ये मंकी पॉक्सचे रुग्ण देशात आढळले. थंडी वाजून ताप येणे, अंग दुखणे, लघवी व शौचास त्रास होणे, अंगावर पुरळ उठणे ही मंकी पॉक्सची लक्षणे आहेत. अशी लक्षणे असलेल्यांनी रुग्णालयात रक्त तपासणी करून घ्यावी. अशी लागण झालेल्या रुग्णांच्या माध्यमातून इतरांमध्ये संक्रमणाची भीती असते. त्यामुळे खबरदारी घेणे महत्त्वाचे आहे, असे डॉ. नवले यांनी सांगितले.

## पिकपच्या धडकेने दुचाकी चालक ठार

✔ **पंढरपूर** : वेगाने जाणाऱ्या पिकअपच्या धडकेने दुचाकी वरील बाळू लक्ष्मण सावंत (वय ५५ रा. पिराचीकुरोली ता. पंढरपूर) हे गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास पिराचीकुरोली येथील हॉटेल तिरंगा समोर घडला. बाळू सावंत हे आपल्या दुचाकीवरून पंढरपूरकडून पिराजीकुरोली येथे आले होते. हॉटेल तिरंगा समोर डिवायडर जवळून वळत असताना एमएच४५-एएफ-७७८३ या क्रमांकाचा लेलँड पिकअप पाठीमागून धडकल्याने ते गंभीर जखमी झाले हो .ते त्यांना पंढरपूर येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले असता ते उपचार दरम्यान मयत झाले. या प्रकरणी पंढरपूर ग्रामीणच्या पोलिसांनी पिकअपचा चालक विठ्ठल अशोक जाधव (रा.उंबरे ता. माळशिरस) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. सहाय्यक फौजदार कर्चे पुढील तपास करीत आहेत.

## भालके समर्थक परिचारकांच्या वाड्यावर

✔ **पंढरपूर** : पंढरपूर-मंगळेवढा मतदारसंघात रोज नवा राजकिय ट्विस्ट येताना दिसत आहे. भगिरथ भालके, अनिल सावंत शरद पवारांना भेटले, साधना भोसले ह्या जयंत पाटलांना भेटले असतानाचआता मंगळेवढ्यातील भालके समर्थकांनी सोमवारी परिचारक यांच्या वाड्यावर हजेरी लावत प्रशांत परिचारक यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यामुळे राजकिय वर्तुळात चर्चे ला उधाण आले आहे.



पंढरपूर : परिचारक यांना शुभेच्छा देताना भालके समर्थक.

माजी आमदार प्रशांत परिचारक यांचा सोमवारी वाढदिवस होता. विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून प्रशांत परिचारक हे दुपारपर्यंत वाड्यावर थांबून शुभेच्छा स्वीकारत होते. पंढरपूरसह जिल्ह्यातील समर्थकांनी शुभेच्छा देण्यासाठी परिचारक वाड्यावर हजेरी लावली होती. मंगळवेढ्यातील भालके समर्थकांनीही पंढरपूरध्ये जाऊन प्रशांत परिचारक यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यामध्ये मंगळवेढा पंचायत समितीचे माजी सदस्य नितीन पाटील, दामाजी कारखान्याचे संचालक बसवराज पाटील, गुलाब थोरबोले, दयानंद सोनगे, भारत बेदरे यांचा समावेश आहे. दरम्यान, परिचारकांना शुभेच्छा द्यायला भालके समर्थ परिचारक वाड्यावर पोहोचल्याने राजकिय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातून माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी विधानसभेची निवडणूक लढवावी, अशी मागणी जोर धरत आहे. मात्र प्रशांत परिचारक यांनी मात्र त्याबाबत अद्याप कोणतेही भाष्य केलेले नाही.

### प्रशांत परिचारकांना वाढदिवसाच्या दिल्या शुभेच्छा

## नांदेड काँग्रेसचे खासदार वसंत चव्हाण यांचे निधन




✔ **नांदेड** : नांदेडचे खासदार आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वसंत चव्हाण (वय ६४) यांचे सोमवारी दीर्घ आजाराने निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर हैदराबाद येथील किम्स रुग्णालयात उपचार सुरू होते.

चव्हाण यांची प्रकृती यकृतामध्ये इन्फेक्शन झाल्यामुळे मागच्या काही दिवसांपासून खालावली होती. सुरुवातीला नांदेडमधील खासगी रुग्णालयात चव्हाण यांना दाखल करण्यात आले होते. त्यानंतर चव्हाणांना एअर ॲम्ब्युलन्सने हैदराबादला किम्स रुग्णालयात नेण्यात आले. मात्र त्यांची मृत्यूशी झुंज अखेर अपयशी ठरली.२०१४ साली वसंत चव्हाण यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. नायगाव मतदारसंघातून अपक्ष विधानसभेची निवडणूक लढवली. ते विधानसभेत आमदार म्हणून गेले. २०२४ च्या लोकसभा निवडणूक त्यांनी भाजपचे उमेदवार प्रतापराव चिखलीकर यांचा पराभव केला होता. ते १६ वर्षे विधानपरिषद आणि विधानसभेचे सदस्य होते.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



विसर्ग कशाला? सगळी भांडी भरून घेते की...!

| कल्याण |
| --- |
| 129-28-116 |

| मुंबई |
| --- |
| 180-93-670 |

## पैशांचा पाऊस पाडतो म्हणून श्रीपूरच्या शेतकऱ्याला १३ लाखांचा गंडा

### ▸▸ वालचंद नगर पोलीस ठाण्यात बडतर्फ पोलिसासह सातजणांवर गुन्हा

✔ श्रीपूर/प्रतिनिधी

पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवून श्रीपूर (ता.माळशिरस) येथील सतीश कृष्णा मांडवे यांची १२ लाख ९८ हजारांची फसवणूक केल्याची घटना घोलपवाडी (ता. इंदापूर) येथील गावाच्या हद्दीत घटना घडली आहे त्यांनी वालचंदनगर पोलीस स्टेशनला फिर्याद दिली आहे. याबाबत वालचंद नगर पोलीस स्टेशनला ७ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

त्यानुसार वालचंद नगर पोलिसांनी उत्तम लक्ष्मण भागवत (रा. घोलपवाडी) काळू रोहिदास गाडे (रा. जांभूड, ता. माळशिरस), श्रीकृष्ण खुडे (रा. बोरगाव, ता. माळशिरस) व दोन अनोळखी महाराज व अनोळखी एक महिला व एक पुरुष अशा सात जणांवर महाराष्ट्र नरबळी आणि अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.वालचंद नगर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार १० जून ते १७ ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये घोलपवाडी गावाच्या हद्दीमध्ये ही घटना घडली आहे.२२ऑगस्ट २०२४ रोजी गुन्हा दाखल झाला.

उत्तम भागवत यांनी सतीश मांडवे यांना पैशाचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवत तुझ्या सर्व अडचणी दूर करतो असे सांगीतले. यासाठी उत्तम भागवत याने घोलपवाडीत त्याच्या राहत्या घरात पूजा विधी व जादूटोणा करून प्रत्येक वेळी वेगवेगळी कारणे सांगून सतीश मांडवे यांच्याकडून रोख व ऑनलाईन १२ लाख ९८ हजार रुपयांच रक्कम घेऊन फसवणूक केली आहे.

### निलंबित पोलिसाने देखील फसवले

माणिक गदादे नामक निलंबीत पोलीसयानेही मांडवे यांची फसवणूक केली आहे. गदादे बडतर्फ असतानाही पोलिसांचा ड्रेस घालून बारामती पोलीस ठाण्यात पोलीस असल्याची बतावणी केली. सतीश मांडवे यांच्या विरोधात बारामती शहर पोलिस ठाण्यात दाखल केलेली केस मिटवतो, असे सांगून त्याने त्यांच्याकडून तीन लाखांची मागणी केली. त्यामधील दीड लाख रुपये रोख स्वरूपात घेतले. दरम्यान गदादे पोलीस हा बडतर्फ असल्याची माहिती मांडवे यांना मिळाली. याबाबत त्यांना विचारणा केली असता गदादे याने त्यांना जीवे मारण्याची तसेच कुटुंबातील सर्वांवर भूतबाधा करून जीवाचे बरे वाईट करण्याची धमकी दिली. याप्रकरणी निलंबित गदादे पोलिसावर वालचंद नगर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.



आरोपी उत्तम भागवत



बडतर्फ पोलिस- माणिक गदादो




## कंटेनरच्या धडकेने दुचाकी चालक ठार

✔ **पंढरपूर** : लक्ष्मी टाकळी (ता.पंढरपूर) येथील बंद पडलेल्या टोलनाक्याजवळ वेगाने जाणाऱ्या कंटेनरच्या धडकेने दुचाकी वरील ४६ वर्षीय इसम गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात शनिवारी दुपारच्या सुमारास घडला. भगवान सिद्राम माने (वय ४६ रा . ओझेवाडी, ता.पंढरपूर) असे मयताचे नाव आहे . ते आपल्या दुचाकी वरून पंढरपूर ते कासेगाव असा प्रवास करीत होते. लक्ष्मी टाकळी येथील टोळनाकाजवळ एमएच ०४-बीसी-८४८४ या क्रमांकाचा कंटेनर पाठीमागून धडकल्याने ते गंभीर जखमी होऊन मरण पावले. या अपघाताची नोंद पंढरपूर तालुका पोलिसात झाली. पोलिसांनी कंटेनरचा चालक सतीश मुरगन (वय ३० रा.तामिळनाडू) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला.सहाय्यक फौजदार बनसोडे पुढील तपास करीत आहेत.

# मनमानीला लगाम

महाराष्ट्रातील महाविकास आघाडीने बदलापूर तसेच राज्यातील महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या निषेधार्थ शनिवारी पुकारलेला बंद मुंबई उच्च न्यायालयाने बेकायदा ठरवला. त्यामुळे आघाडीच्या नेत्यांना बंदपासून काढता पाय घ्यावा लागला. कोर्टाचा हुकूमनामा राजकारण्यांना कशाप्रकार वाकवतो हे यातून दिसून आले. आम्ही करेल ती पूर्व दिशा असा राजकारण्याचा खाक्या अलिकडच्या काळात दिसून येत आहे. मुळात या प्रश्नावर बंद पाळता येतो का, हा खरा प्रश्न होता. विविध क्षेत्रातील विचारवंतांनी त्याला आक्षेपही घेतला होता. निदान ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी तरी समजदारपणा दाखवून आघाडीच्या नेत्यांचे कान उपटायला हवे होते. पण तापलेल्या तव्यावर आपणही पोळी भाजून घ्यावी, अशी पवारांनी सुप्त इच्छा होती काय कोणास ठाऊक. पवारांनी समजदारपणा दाखवला असता तर त्यांचा मोठेपणा ठरला असता पण ती संधी त्यांनीही घालवली आणि कोर्टाचा दणका बसताच पवारांना बंदची घोषणा मागे घ्यावी लागली. ही एक प्रकारे त्यांची नामुष्कीच म्हणावी लागेल. कोर्टाने ''पुढील आदेशापर्यंत सर्व संबंधितांना २४ ऑगस्ट २०२४ रोजी किंवा त्यानंतरच्या कोणत्याही तारखेला महाराष्ट्र राज्यात बंदची हाक देण्यास मनाई करून कोर्टाने आघाडीच्या नेत्यांच्या मुसक्याच आवळून टाकल्या. कोर्टाच्या आदेशानंतर आघाडीने राज्यव्यापी मूक आंदोलन केले. हे ठीक आहे. बंदचे परिणाम काय होतात हे राजकारण्यांना माहीत असते तरी देखील हा मूर्खपणा केला जातो. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने लोकल ट्रेन, बस आणि रस्ते बंद राहतील, असा उल्लेख असलेल्या बातम्यांची दखल घेत बंदचा अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक सेवांवर होणारा परिणाम अधोरेखित केला. बंदमुळे दैनंदिन व्यवहारांवर परिणाम होण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे



जनजीवन विस्कळित होऊ शकते. मुंबई हायकोर्टाने सर्वोच्च न्यायालय आणि इतर उच्च न्यायालयांच्या मागील निकालांचा संदर्भ देत, असे म्हटले आहे की, जर असा बंद पाळला गेला, तर त्याचा शहराची जीवनरेखा मानल्या जाणाऱ्या मुंबईतील लोकल ट्रेनसह आपत्कालीन सेवा व सार्वजनिक सुविधांवर विपरीत परिणाम होईल आणि मुंबईचे संपूर्ण जनजीवन ठप्प होण्याची शक्यता आहे, असे खंडपीठाने म्हटले आहे. याखेरीज रूग्ण, विद्यार्थी, लहान सहान विक्रेते याच्याही जीवनावर परिणाम होत असतो. भूतकाळात निषेध करण्याच्या अधिकाराशी संबंधित प्रकरणे हाताळताना, सर्वोच्च न्यायालयाने भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ (१) चा उल्लेख केला आहे. विशेषतः भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार हा शस्त्राशिवाय शांततेने एकत्र येण्याचा अधिकार, लोकांना शांततेने निषेध करण्याचा अधिकार देतो, असे मत मांडले आहे. परंतु, कलम १९ (२) अन्वये सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी निषेध करण्याच्या अधिकारात काही निर्बंधासह संतुलन राखण्याचे काम न्यायालयाला अनेकदा देण्यात आले आहे. २०११ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने त्याच वर्षी ४ जूनच्या रामलीला मैदानातील घटनेची स्वतःहून दखल घेतली. भ्रष्टाचाराविरुद्ध बाबा रामदेव यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी जमलेल्या आंदोलकांना पोलिसांनी मध्यरात्री बळजबरीने बाहेर काढले. जेव्हा एखाद्या राजकीय पक्षाकडून 'बंद'ची हाक दिली जाते, तेव्हा परिस्थिती बिघडण्याची शक्यता जास्त असते. बंद अनेकदा विशिष्ट ठिकाणी पुकारला जातो, जसे की सध्याच्या बाबतीत 'मविआ'ने संपूर्ण महाराष्ट्रात 'बंद'ची हाक दिली होती. जुलै १९९७ मध्ये केरळ उच्च न्यायालयाने, ''जेव्हा आयोजक बंदची हाक देतात, तेव्हा ते त्यांचा हेतू स्पष्टपणे व्यक्त करतात की, बंदच्या दिवशी सर्व दैनंदिन कारभार ठप्प राहील'', अशी 'बंद'ची व्याख्या केली. न्यायालयाला असे आढळून आले की, यात सहसा संबंधित व्यक्तीला त्याच्या कामासाठी गेले असल्यास किंवा त्याने त्याचे दुकान उघडे ठेवल्यास परिणाम भोगण्याची धमकी दिली जाते. त्यामुळे मुक्तपणे फिरण्याच्या आणि कोणत्याही व्यवसायाचे पालन करण्याच्या अधिकारांचे उल्लंघन करते (अनुच्छेद १९), मुंबई उच्च न्यायालयाने २००४ मध्ये बी. जी. देशमुख प्रकरणात निकाल देताना राजकीय पक्ष किंवा व्यक्तींनी पुकारलेला बंद बेकायदा आणि घटनाबाह्य ठरविला होता.सामान्य कायद्याच्या तत्वांनुसार याला कायदेशीर मान्यता नाही. कोर्टाच्या या निकालातून पुरोगामी महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांनी व राजकीय संघटनांची बोध घेतला पाहिजे. इलेक्शन स्टंटसाठी हा बंद होता, यात शंकाच नाही.

अध्यात्म

# जनहितदक्ष भगवान श्रीकृष्ण

**दहीहंडीची स्पर्धा भरवण्याचा दिवस एवढ्या पुरता आपण श्रीकृष्णाचा जन्मदिन मर्यादित करणार आहोत काय? बालपणीचा श्रीकृष्ण नटखटपणा आणि मोठेपणाच्या कृष्णाचे चातुर्य, त्यांचे बुद्धी कौशल्य आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यांचे जनता हितदक्ष असणे, या सगळ्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. आज ही अनुकरणीय आहे. कृष्ण या! केवळ दोन शब्द जीवनाचा सार उमटलेला दिसतं. सखा, मित्र, मार्गदर्शक, कारण हार किती किती रूपात श्रीकृष्णाला पाहावं! पुन्हा बालगोपाल, युवक आणि प्रगल्भ प्रौढ अशा कोणत्याही अवस्थेत आपला ठसा उमटवणारे हे अजोड, अतुलनीय व्यक्तिमत्व! त्याविषयी काय आणि किती समजून घ्यावे! आपली लेखणी कमी पडावी असे हे व्यक्तिमत्व! संतश्रेष्ठ ज्ञानदेवांच्या शब्दात, हे अपार कैसेनि कवळावे! महातेज कवळणे धवळावे! गमन मुठी सुवावे मशके केली!! हे गगनासारखं उत्तुंग व्यक्तिमत्व आपल्यासारख्याने लेखणीत कसं पकडावं? तरीही त्यांच्या काही उद्‌बोधक पैलूंचा परिचय करून घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न...**

----------------------

परमेश्वराच्या दहा अवतारातील आठवा अवतार म्हणजे श्रीकृष्ण रूप होय. श्रावण वद्य अष्टमी या दिवशी देवकीच्या पोटी वसुदेवाचा हा आठवा पुत्र जन्मास आला. परंतु कंसापासून मृत्यू भयामुळे दूर ठेवावं म्हणून यशोदा आणि नंद यांच्याकडे त्यांचं संगोपन झालं. हा बालरुपातील श्रीकृष्ण त्यांच्या बालपणातील लीलांनी, खट्याळपणाने सगळ्यांनाच मोहित टाकत असे. असा हा श्रीकृष्ण जनतेच्या रक्षणाप्रसंगी गर्दनकाळ ठरत असे. यमुनेच्या डोहातील कालिया नागाला ठार मारून प्रजेची त्या संकटातून मुक्तता केली. तसेच त्याने गोवर्धनधारी बनवून इंद्राच्या कोपापासून जनतेचे रक्षण केलं, त्यांच्या पराक्रमाच्या अशा सूचक कथा सांगितल्या जातात.

**'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम।। परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ।।' अर्थ** - जेव्हा जेव्हा धर्म माजतो, तेव्हा तेव्हा अधर्माचा नाश करून धर्माचा उदय करण्यासाठी मी प्रकट होतो हे त्याने सांगितलेलं ब्रीद असं, त्यांच्या जीवन कार्याला तंतोतंत लागू पडतो.

एक उत्कृष्ट गुरु ठरलेल्या श्रीकृष्णाचा अध्ययन अवंती नगरीत सांदीपनी ऋषीकडे झालं. शिक्षण पूर्ण झाल्यावर आला गुरुदक्षिणेचा प्रसंग! सांदीपनी ऋषी म्हणाले, 'शंकासुराने माझ्या मुलाचा हरण केला आहे. तू माझा पुत्र मला परत आणून दे. श्रीकृष्णाने त्याप्रमाणे शंकासुराचा वध करून गुरुपुत्राला परत गुरुग्रही आणलं. श्रीकृष्णाची गुरुनिष्ठा अशी अढळ होती.

गुरुनिष्ठेप्रमाणेच श्रीकृष्णाची जनहितदक्ष निस्सीम होती. कंसाचा वध श्रीकृष्णाने केला, त्यामुळे कंसाचा सासरा जरासंध खवळला. तो मथुरेवर, श्रीकृष्णावर चालून गेला. एकदा, दोनदा नव्हे, सतरा वेळा त्याने मथुरेवर हल्ला केला. प्रत्येक वेळी श्रीकृष्णाने यादव सैन्याच्या मदतीने त्याचा पाढाव केला. आठव्या वेळी हल्ला करणाऱ्या जरासंधाचे बळ वाढले होते. आपले यादव सैन्य अपुरे पडेल हे लक्षात येताच भगवान कृष्ण जी रणनिती आखली, जो डावपेच रचला त्याला तोड नाही. हल्ला होण्याच्या आधी त्याने सर्व मथुरावासीयांना त्यांच्या मालमत्तेसह सुखरूप द्वारका नगरीत नेऊन बसवले, आपली राजधानी मथुरेहून द्वारकेला हलवली. मथुरावासीयांना द्वारकेत पाठवताना कृष्ण त्यांना म्हणाला, 'मी स्वतः बालरामासह गोवर्धन पर्वताकडे जातो. जरासंध माझा पाठलाग करत राहील, तोपर्यंत तुम्ही सुखरूप द्वारकेत राहा.'

तीन गोष्टी शिकायला मिळतात श्रीकृष्णाच्या या कथेतून! जनतेविषयी आत्यंतिक तळमळ, दूरदृष्टी, शत्रूचे मन ओळखण्याची शक्ती, त्यानुसार डावपेच आखण्याची युक्ती, आजच्या राजकर्त्यांसाठी आदर्श ठरावी अशी ही राजनीती आहे. आज भूकंप इत्यादी आपत्तीमुळे गावचे गाव गाडले जातात. मग राजकर्त्यांना जाग येते, नंतर ते मदतीसाठी जातात. 'वराती मागून घोडे' अशी धोरणे आखणाऱ्या शासनाने आपत्तीपूर्व व्यवस्थापन कसे करावे हे श्रीकृष्णाकडून शिकावे. भगवान श्रीकृष्णाकडून कित्ता गिरवावा अशा अनेक गोष्टी आहेत. श्रीकृष्ण अनेक शस्त्रे चालवण्यात पारंगत होते. गदायुद्धातही त्यांनी प्रावीण्य मिळवलं. त्यांच्या पराक्रमाचे वर्णन राजसुय यज्ञाच्या प्रसंगी केले आहे. इथे जमलेल्या या विशाल राज्यसमूहात कृष्णाच्या तेजाने जिंकला गेला नाही असा एकही राजा



किंवा क्षत्रिय मला दिसला नाही असं ते सांगतात.

'अर्जुन एकदा युधिष्ठीराला ठार मारायला निघाला. का? त्याला एक कारण होतं. अर्जुन हा प्रख्यात धनुर्धारी होता. गांडीव हे त्यांचं धनुष्य प्रसिद्ध होतं. ते दुसऱ्याला देऊन टाक असं जो म्हणेल त्याचा मी शिरच्छेद करीन' अशी प्रतिज्ञा अर्जुनाने केली होती. कुरुक्षेत्रावर युद्धात करणारे युधिष्ठीरने राज्याचा पराभव केला. युधिष्ठीरला आशा होती की, अर्जुन कर्नाला मारेल, परंतु अर्जुनाने तसे केले नाही. त्यामुळे रागाच्या भरात युधिष्ठीर अर्जुनाला म्हणाला, 'तुझ्यापेक्षा जो कुशल असेल, त्याला तुझं धनुष्य देऊन टाक'. यावर अर्जुन खवळला. प्रतिज्ञा अनुस्वार युधिष्ठीरचा वध करण्यास निघाला. तेव्हा श्रीकृष्णाने त्याला थांबवले. अर्जुन म्हणाला, 'प्रतिज्ञा करून माझा मूर्खपणा झाला खरा, पण आता उपाय सांगा.' त्यावर चतुर श्रीकृष्ण म्हणाले, 'गुरूंची निर्भत्सना करणे म्हणजेच त्याचा वध करणे होय. म्हणून तू युधिष्ठीरची निर्भत्सना कर म्हणजे त्यांचा वध केल्याप्रमाणे होईल. अर्जुनाने तसे केले पण तरीही अडचण होतीलच' जो युधिष्ठीराचा वध करेन त्याचा मी शिरच्छेद करीन अशी माझी दुसरी प्रतिज्ञा आहे, असे अर्जुनाने सांगितले आणि तो म्हणाला तेव्हा आता माझे मस्त कापले पाहिजे. त्यावर श्रीकृष्ण म्हणाले, 'तू ज्या पद्धतीने युधिष्ठीराचा वध केलास त्याच पद्धतीने तू स्वतःचा वध कर.' यावर अर्जुनाला पेच पडला तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले, 'तू सहमुखाने तुझी प्रशंसा करून घे. स्वतःच्या गुणांची प्रशंसा स्वतः करणे हाच मनुष्याचा खरा वध होय. इथे श्रीकृष्णाने अर्जुनाला ज्या पद्धतीने संकटातून सोडवले, त्यावर आज अधिक काही भाष्य करण्याची गरज आहे काय? गोकुळाष्टमीच्या या मंगल काळात आपण आपल्यातील श्रीकृष्णाला जागवूया, जीवन सुंदर करूया.!

**- जयश्री पुजारी, सोलापूर.**

टुडेज् ब्लॉग

# वेळेचे महत्त्व ज्यांना कळते, तीच चांगली व्यक्ती

वेळ अमूल्य आहे. वेळेचा सदुपयोग करता आला पाहिजे. जे लोक वेळेचा सदुपयोग करतात ते जीवनात यशस्वी होतात. वेळेचे महत्त्व ज्यांना कळते ते आपल्या जीवनातील वेळ वाया घालवत नाहीत.एक मिली सेकंदाचे महत्त्व ऑलिम्पिक स्पर्धेत धावणाऱ्या खेळाडूला कळते.पाच मिनिटांचे महत्त्व बसस्टॉपवर उशिरा येणाऱ्या प्रवाशाला कळते आणि तीन तासांचे महत्त्व परीक्षा देणाऱ्या परीक्षार्थींना कळते.जे लोक वेळेचा अपव्यय करतात त्यांना जीवनात नेहमी अपयशी व्हावे लागते.परंतु, या जगात असेही काही लोक आहेत जे स्वतः वेळेचा सदुपयोग करतात आणि इतरांसाठी स्वतःचा अमुल्य वेळ देऊन त्यांच्या जीवनात आनंद पेरण्याचे काम करतात.

आपल्या महामानवांनी त्यांचे सगळे आयुष्य समाजासाठी, सामान्य जनतेच्या कल्याणासाठी व देशासाठी खर्च करून आपल्या सर्वांचे जीवन सुखी केले आहे. शास्त्रज्ञांनी त्यांच्या जीवनातील संपूर्ण वेळ संशोधनासाठी दिला आणि नवनवीन शोध लावून व यंत्रांची निर्मिती करून आपल्या जीवनातील अंधार नष्ट केला. वेगवेगळे खेळ खेळणारे नामांकित खेळाडू दररोज खेळाचा भरपूर सराव करतात म्हणजे वेळेचा सदुपयोग करतात. विविध विषयांवर लेखन करणारे लेखक अगोदर अवांतर वाचनासाठी खूप वेळ देतात.भाषणाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करण्यासाठी प्रभावी वक्ता दिलेल्या विषयाला न्याय देण्यासाठी किंवा मुद्देसूद विषयाची मांडणी करण्यासाठी अगोदर वेळ देतात आणि तयारी करतात. स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी जास्तीत जास्त वेळ रिडींगरुमध्ये बसून वाचन व वाचनच करतात. काही सामाजिक कार्यकर्ते आपले जीवन समाजासाठी देतात, काही डॉक्टर आपला सगळा वेळ पेशंटवर योग्य उपचार करण्यासाठी खर्च करतात. कर्तव्यदक्ष शिक्षक शाळेत नेहमीच वेळेवर येतात आणि वर्गात वेळेवर जाऊन शिकवतात सुध्दा. या सगळ्यांना वेळेचे सदुपयोग करण्याचे तंत्र अवगत झालेले असते आणि म्हणून सर्वांना उद्देशून असा प्रश्न विचारावा वाटतो की इतरांच्या हितासाठी तुमच्याकडे वेळ आहे का? या प्रश्नाचे उत्तर देताना



मला माझ्या काही नातेवाईकांची व काही मित्रांची आठवण होणे स्वाभाविक आहे. कारण ते इतरांच्या हितासाठी आपला अमूल्य वेळ नक्कीच देतात. माझे बंधू प्रा. राजेंद्र गुळवे हे समाजकार्यासाठी सुट्टीचा दिवस राखून ठेवतात. खंडाळीचे भूमिपुत्र प्रा. परमेश्वर पौळ हे नेहमीच पर्यावरण रक्षणासाठी आपला वेळ खर्च करतात. राजाभाऊ पौळ हे समाजकारणात सक्रीय आहेत. खंडाळी गावातील सर्व लहान थोरांना फेसबुकवर पोस्ट लिहून वाढदिवसाच्या शुभेच्छा देतात. सेवानिवृत्त शिक्षक गणेशराव गुळवे गुरुजी यांना समाजकार्य करण्याची मनस्वी आवड आहे.स्वत:चा पैसा व स्वत:चा वेळ खर्च करून ते आजही समाज प्रबोधन करतात.


माझे काही शिक्षक मित्र आहेत जे नेहमी सामाजिक उपक्रमांसाठी न चुकता वेळ देतात. एकनाथ पलमटे,शिवाजी वाघमारे, प्रेमनाथ गायकवाड, नवनाथ आचार्य, विलास आगलावे, धनंजय उजनकर, दत्तात्रय मोहिते, दिव्यांग शिक्षक व गिर्यारोहक अनंतराव धुळशेट्टे हे माझे मित्र इतरांच्या मदतीसाठी नेहमीच वेळ देतात. सामाजिक उपक्रम राबवणे, महामानवांचे जयंती सोहळे साजरे करणे, अडचणीत सापडलेल्या नातलगांना व मित्रांना नेहमीच मदत करणे ह्या कामांसाठी ते नक्की वेळ देतातच.

काही लोक आपले स्वतःचे वाहन इतरांना कधीच देत नाहीत. पण माझे मित्र बालाजीराव केंद्रे हे असे अवलिया आहेत जे स्वतः बसने प्रवास करतात आणि आपली स्वतःची कार आपल्या मित्रांना प्रवासासाठी देतात. जि. प. प्रशाला वडवळ या शाळेतील शिक्षक मित्र राहुल गायकवाड सर हे शिक्षक संघटनांचे सक्रीय कार्यकर्ते आहेत. पदरमोड करुन ते समाजकार्यात हिरिरीने पुढाकार घेतात. एवढ्या मोठ्या मनाची माणसं फार तुरळक आहेत! जे आपल्या जीवनातील अमूल्य वेळ समाजासाठी, इतरांच्या हितासाठी देतात. अशा व्यक्ती समाजासाठी व देशासाठी फार महत्त्वाच्या आहेत. इतरांच्या हितासाठी आपला अमूल्य वेळ देणे ज्यांना जमते ती खरोखरच चांगली व्यक्ती म्हणून नावारुपाला येतात.

**- बबन गुळवे, जि. लातूर.**

जन्म हा अखेरचा

## अंगालेपस्थल



घटादिषु पृथग्भूतं यथाकाशं न भिद्यते। तथोपाधिगतं ब्रह्म नानारूपं न भिद्यते ।।२०.४५।।

शिवयोगी सर्वसामान्य माणसांप्रमाणे देहधारी असतो, तो प्रपंचात राहत असतो. एका देहात राहणाऱ्या आत्म्याला परब्रह्म, परमात्मा, देश-काल अपरिच्छिन्न असे कसे काय म्हटले जाते? असा प्रश्न तुमच्या मनात स्वाभाविकपणे निर्माण होऊ शकतो. या प्रश्नाचे समाधान येथे केले आहे. हजारो घट निर्माण झाले तर प्रत्येक घटात एक एक आकाश उपस्थित असते. हजारो घरे निर्माण झाली तर प्रत्येक घरात एकेक गृहाकाश असते. मनुष्य घरात राहतो म्हणजे घरातल्या पोकळीत अर्थात आकाशात राहत असतो. तो भिंतीत किंवा छतात राहत नसतो. चार भिंती घालून वर छप्पर घातले की आपले घर तयार होते. आकाशाला अशाप्रकारे मर्यादित केले आहे असे आपल्याला वाटते. आपण घर बांधत असतो, आकाश निर्माण करीत नसतो किंवा ते आपल्या घरात भरतही नसतो. अमर्याद, अफाट असे महाकाशच आपल्या घरात चार भिंतीच्या मध्ये छोटेसे होऊन राहते. प्रत्येक घरात ते वेगवेगळे भासते. परंतु खरोखर आकाशाचे तुकडे पडलेले असतात काय? तर तसे नसते. दोन घडे घेऊन ते एकावर एक आपटून फोडले तर त्यातील आकाश एक होते काय? हजारो घट निर्माण केले तरी त्या गावातील आकाश कमी होत नाही, किंवा हजारो घट आणून एखाद्या गावात फोडले तर घटातील आकाश तेथील आकाशात मिसळून ते आकाश वृद्धिंगत होत नाही. **(क्रमश:) – काशी जगद्‌गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## सरकारचे ज्येष्ठांसाठी उचित पाऊल

राज्य मंत्रिमंडळाच्या रविवारी झालेल्या बैठकीत ज्येष्ठ नागरिकांसाठी ज्येष्ठ नागरिक महामंडळ स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला ही बातमी आज वाचण्यात आली. या निर्णयामुळे ज्येष्ठ नागरिकांना आजारपण, म्हातारपण, बेरोजगारी विकलांगता यासारख्या गोष्टीत साहाय्य मिळेल महाराष्ट्रात ज्येष्ठांची संख्या सव्वा कोटींपेक्षा जास्त आहे. साहजिकच त्यांचा वृद्धापकाळ सुसह्य होण्यास मदत मिळणार आहे. या महामंडळाचे कार्यालय मुंबई येथे असेल व भागभांडवल ५० कोटी इतके असेल. भारतातील ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढत चालले असून २०५० पर्यंत ते जवळपास २०.८ एवढे होण्याचा अंदाज आहे हा अंदाज संयुक्त राष्ट्रांच्या लोकसंख्या निधीने व्यक्त केला आहे. ज्येष्ठांसाठी सर्वच पातळीवर प्रयत्न चालू आहेत. केवळ ज्येष्ठ नागरिकांना विम्याची सोय करून



चालणार नाही तर त्यांना त्यांची कुटुंबात काळजी घेण्याची सुद्धा आवश्यकता आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी अनेक संस्था सुद्धा काम करत आहेत.

घरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी आजारपणात त्यांची योग्य ती काळजी घेण्यासाठी अनेक कॉर्पोरेट कंपन्या सुद्धा महत्त्वाचे काम करीत आहेत. डाईस बँकेने कर्मचाऱ्यांच्या पालक व सासू-सासरे यांच्यासाठी मानसोपचार तज्ज्ञांमार्फत सल्ला देण्याचे काम सुरू केले आहे. ज्येष्ठांसाठी टेलिकन्सल्टनची सुविधा सुद्धा सुरू करण्यात आली आहे. ज्येष्ठांनी स्मृतीभ्रंशाचा सामना कसा करावा? निवृत्तीचे नियोजन कसे करावे? या विषयावर बेबिनार्स सुद्धा घेण्यात येतात. जर्मनीच्या सॅप या कंपनीने 'एल्डर केअर लिव्ह' ही योजना सुरू केली आहे. एचएसबीसीने 'वेलनेस ऍप' सुरू केले आहे. एकूणच काही कॉर्पोरेट कंपन्या सुद्धा वृद्धांसाठी चांगले काम करीत आहेत. आता त्याला सरकारी जोड मिळेल. आज अनेक वृद्धांना पेन्शन इत्यादी फायदे नाहीत. त्यामुळे त्यांना आजारपण किंवा वृद्धावस्थेत पैशाविना बिकट अवस्थेत दिवस काढावे लागत आहेत. परदेशात वृद्धांसाठी अनेक प्रकारची काळजी घेतली जाते. त्यांचे जीवन आनंदात कसे जाईल हे पहिले जाते. भारतात सुद्धा अशा वृद्धांसाठी अनेक योजना सुरू व्हाव्यात. महाराष्ट्र सरकारने वृद्धांसाठी महामंडळ स्थापना करून एक प्रकारचा दिलासा वृद्धांना दिला आहे, असे वाटते.

**- शांताराम वाघ, पुणे.**

# शिक्षकांचे टेन्शन कायम!

शिक्षकांची नक्की कामे कोणती, असा प्रश्न अनेकांना पडत असेल. खास करून सरकारी शाळा, अनुदानित शाळांमधील शिक्षक, विद्यार्थी तसेच त्यांच्या समस्त पालकांना हा प्रश्न वर्षानुवर्षे सतावत होता. अखेर सरकारने जीआर म्हणजे शासन निर्णय प्रसिद्ध करून यात पारदर्शकता आणली आहे. सरकारने शैक्षणिक आणि अशैक्षणिक अशी वर्गवारी करून शिकवणे तसेच शिक्षणासंदर्भातील कामे शैक्षणिक आणि ज्या कामांचा शिक्षण विभागाशी काहीही संबंध नाही ती अशैक्षणिक असे स्पष्ट केले आहे. या जीआरमुळे समस्त शिक्षकांच्या चेहऱ्यावर नक्कीस हसू फुलले असेल. मात्र, त्यानंतर सरकारने अशी काही मेख मारली आहे की विचारता सोय नाही. निवडणुकींच्या कामाची जबाबदारी तसेच जनगणना ही कामे शिक्षकांचीच असल्याचे स्पष्ट केले आहे. सरकारने जीआरची औपचारिकता पार पाडून शिक्षकांचे टेन्शन कायम ठेवले आहे.

विद्यार्थ्यांना शिकवणे हे शिक्षकांचे पहिले आणि सर्वात महत्त्वाचे काम असते. किंबहुना तीच मुख्य जबाबदारीही असते. मात्र, याला आपल्या देशाचा किंबहुना महाराष्ट्राचा अपवाद म्हणावा लागेल. कारण शिक्षकांना शाळाव्यतिरिक्त इतकी कामे करावी लागतात की शिक्षणाच्या माध्यमातून भावी पिढी शिक्षित करणे हे दुय्यम काम झाले आहे. त्यातही शिक्षक शासकीय शाळा किंवा अनुदानित शाळांमधील असतील तर प्रकरण खूपच अवघड मानायला हरकत नाही. शिक्षकांनी शाळांमध्ये शिकवणे याव्यतिरिक्त त्यांच्या डोक्यावर अनेक कामांचा बोजा असतो. त्यातील पहिले काम म्हणजे निवडणुकांची ड्युटी. हे काम शिक्षकांचे नाही, ते शिक्षकांना देऊ नये, यासाठी शिक्षक आणि शिक्षक संघटना अनेक वर्षे सरकारशी संघर्ष करत आहेत. या कामातून मुक्त करा, या मागणीसाठी त्यांनी अनेकदा आवाज उठवला आहे. मात्र, स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होऊनही शिक्षक इलेक्शनच्या ड्युटीतून मुक्त होऊ शकलेले नाहीत. आता तर राज्य सरकारने जीआर म्हणजे शासन निर्णय काढून शिक्षकांच्या कामांची वर्गवारी केली आहे. राज्य सरकारने दि. २३ ऑगस्ट रोजी जीआर काढून शिक्षकांची शैक्षणिक कामे कोणती आहेत, हे स्पष्ट केले आहे. एवढेच नाही तर जी कामे अशैक्षणिक आहेत म्हणजेच ज्याचा शिक्षण विभागाची कसलाही संबंध नाही, ती कामे शिक्षकांनी करू नयेत, असेही स्पष्ट केले आहे. हा जीआर पाहून सुरुवातीला शिक्षकांना दिलासा मिळाल्याचा आनंद मिळतो आणि त्यानंतर सरकारने जी कामे शिक्षक नको म्हणतात तीच कामे त्यांच्या माथी मारून स्वत:च्याच जीआरचा फज्जा उडवला आहे. सरकारच्या या नव्या जीआरमुळे शिक्षकांमध्ये नाराजी पसरली आहे. कारण निवडणुकींचे काम तसेच जनगणनेचे काम शिक्षकांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे.



जनगणना आणि निवडणुकीच्या कामातून शिक्षकांना मुक्त करा, अशी मागणी कित्येक वर्षे होत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे शिक्षक शिकवण्याच्या कामापासून बाजूला पडतात. जनगणनेच्या कामासाठी घरोघरी जाणे, त्यानंतर त्यांची माहिती घेणे, ती माहिती संकलित करून सरकारकडे पाठवणे हे काम खूप जिकिरीचे आणि जबाबदारीचे शिवाय वेळखाऊ काम आहे. या कामामुळे शिक्षक शाळेबाहेर जास्त असतात आणि विद्यार्थी अभ्यासाशिवाय शाळेत बसून असतात. जे जनगणनेच्या कामाच्या बाबतीत होते तसेच निवडणूक ड्युटीच्याही कामाबाबत होते. म्हणूनच शिक्षकांवर अतिरिक्त कामाचा बोजा नको, अशी त्यांची मागणी आहे आणि ही मागणी कायम दुर्लक्षित केली जात आहे. मुख्य म्हणजे शिक्षकांना निवडणुकांची ड्युटी लावल्यानंतर त्यांना या कामासाठी पूर्ण तीन ते चार दिवस द्यावे लागतात. स्थानिक स्वराज संस्थांच्या म्हणजेच नगरपालिका, महापालिका यांच्या निवडणुका तसेच विधानसभा शिवाय लोकसभा निवडणुकांची कामे शिक्षकांच्या माथी मारलेली असतात. आपल्याकडे सतत कुठली ना कुठली निवडणूक होत असते. शिवाय शाळांमध्ये काही योजना राबवल्या जातात.

सध्या 'माझी शाळा, सुंदर शाळा' ही योजना सुरू आहे. यासाठी प्रचंड पेपरवर्क करावे लागते, फोटो अपलोड करावे लागतात. अशा कामांसाठी शिक्षकांचा बराच वेळ खर्च होतो. या सर्व ताणामुळे शिकवणे दुय्यम होऊन जाते. वास्तविक शिक्षण हा देशाच्या विकासाचा खरा पाया आहे. या शिक्षणाच्या पायावरच आपली पिढी घडते. मात्र, शिक्षकांच्या मागे वेगवेगळी कामे लावून या पायाला सुरुंग लावण्याचे काम सरकार करत आहे, पण असे केल्याने त्याचा विपरीत परिणाम मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर होत असतो. शिक्षक हा सुशिक्षित आणि विश्वासार्ह घटक मानला जातो. त्यामुळे त्यांच्यावर निवडणूक आणि जनगणनेची महत्त्वाची आणि किचकट कामे सोपवली जातात. पण ती कामे करताना शिक्षकांना बराचसा वेळ शाळेच्या बाहेर जात असतो. त्यामुळे त्यांच्यावर या कामाचा बोजा पडत असतो. या कामांसाठी त्यांना बरीच पायपीट करावी लागते. त्यामुळे शारीरिक श्रम त्यांना करावे लागतात. त्यात त्यांची दमछाक होत असते. सरकारने यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याची गरज आहे. सरकार म्हणते जी कामे शिक्षण विभागाशी संबंधित नाहीत, ती कामे अशैक्षणिक आहेत. त्यामुळे शिक्षकांना अशी अशैक्षणिक कामे सांगितली जाणार नाहीत. मग निवडणुकीची कामे, जनगणनेची कामे किंवा आपत्ती निवारणाची कामे ही शिक्षणाशी संबंधित आहेत का? ही कामे शिक्षकांना का करायला लावता? सरकारने इथेच मेख मारली आहे. शिक्षकांनी फक्त शैक्षणिक कामे करावीत, असे सांगताना बालकांना मोफत व सक्तीचा अधिनियम २००९ मधील कलम २७ अंतर्गत नियमाचा आधार घेत दर दहा वर्षांनी होणारी जनगणना, आपत्ती निवारणाची कामे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, विधानसभेची निवडणूक आणि लोकसभेची निवडणूक या ड्युटी अनिवार्य असल्याचे नमूद केले आहे. मुळात ही कामे शिक्षक वर्षानुवर्षे इमानेइतबारे करत आहेत. मग सरकारने वेगळे काय केले? उलट ही कामे शिक्षकांचीच जबाबदारी असल्याचे जीआरमधून स्पष्ट केले आहे.

**- अविनाश चंदने.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाच वेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR/२००२/०९७०७. Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.


श्रध्दास्थान
दैनिक
सुराज्य
वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा!
: शुभेच्छुक :
भारतीय जनता पार्टी, अक्कलकोट विधानसभा


श्री लक्ष्मी दुग्धालय नॅचरल मलईयुक्त दुग्धजन्य पदार्थ व स्विट
अक्कलकोट-सोलापूर रोड, अक्कलकोट
दैनिक सुराज्यच्या वर्धापनदिनास
हार्दिक शुभेच्छा!
नॅचरल मलईयुक्त दुग्धजन्य पदार्थ, स्विट व स्नॅक्स
दुध संकलन
मलईयुक्त
ताक, मठ्ठा, लस्सी, बासुंदी, दही, श्रीखंड, आम्रखंड, पनीर, खवा (गाईचे व म्हशीचे ) लोणी (गाईचे व म्हशीचे), सुगंधी दुध, चक्का, मलईयुक्त कुल्फी
नॅचरल फळयुक्त
मँगो रबडी, अंजीर रबडी, पेरु रबडी, स्ट्रॉबेरी रबडी, अंगूर रबडी, चिक्कू रबडी, सिताफळ रबडी, काळाद्राक्ष रबडी, जांभूळ रबडी, गुलकंद रबडी व अमूल बटर, चीज, ग्रीनपीस, मिक्सर व्हेजिटेबल, स्विटकॉर्न (मका), पनीर मसाला, शेंगा चटणी, कडक भाकरी, बाकरवडी मिळेल.
बेकरी पदार्थ
ब्रेड, टोस्ट, खारी, बटर, बनपाव, मस्कापाव, नानकटाई बिस्कीट, उपवासाचे शाबू पापड, शाबू व बटाटा चिवडा, डिंक लाडू, चिप्स
नाष्टा
समोसा, ढोकळा, काचिवडा, भडंग चिवडा, फरसाण, इडली वडा, पुरी भाजी, शिरा, उप्पीट, डोसा, ऑम्लेट
स्वीट
पेढा, बर्फी, कुंदा, लाडू, जिलेबी, गुलाबजामून, बालुशा, काजुकतली
शाखा क्र. १ : मंगरुळे हायस्कूल चौक, बायपास रोड, जंगी प्लॉट, अक्कलकोट
शाखा क्र. २ : मंगरुळे हायस्कूल चौक, टोळ अंबाबाई मंदिराजवळ, अक्कलकोट
शाखा क्र. ३ : भारत गॅस गोडाऊनशेजारी, स्टेशन रोड, अक्कलकोट
शाखा क्र. ४ : अक्कलकोट-सोलापूर महामार्ग, ब्यागेहळ्ळी फाटाच्यापुढे, तोतला फार्म हाऊसशेजारी, अक्कलकोट, जि. सोलापूर
शाखा क्र. ५ : एस.टी. स्टॅन्डसमोर, स्वामी कॉम्प्लेक्स, मादनहिप्परगा ता.आळंद, जि.कलबुर्गी.
प्रोप्रा. रेवणसिध्द निंगण्णा पाटील
मो. 8087249836, 9673757477

## संक्षिप्त वृत्त




### बदलापूर घटनेच्या निषेधार्थ युवासेनेचे मूक आंदोलन

**अकलूज** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. न्यायालयाने सदर बंद बेकायदेशीर ठरविल्यामुळे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी बंद मागे घेतला व संपूर्ण महाराष्ट्रात बदलापूरच्या घटनेचा निषेध करण्यासाठी काळ्या फिती बांधून व काळे झेंडे दाखवत युवासेनेच्यावतीने युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे यांच्या नेतृत्वाखाली माळशिरस तालुक्यातील संगम येथे बदलापूर घटनेचा व घटनेतील नराधमाचा जाहीर निषेध करण्यात आला. ज्याप्रमाणे न्यायालयाने बंद बेकायदेशीर आहे, असे जाहीर केले व बंदला विरोध करत तत्परता दाखवली तशीच आरोपीला फाशी देण्याची तत्परता कोर्टाने दाखवावी, अशी मागणी युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे यांनी केली. यावेळी युवती सेना जिल्हा प्रमुख साक्षी भिसे, तालुका प्रमुख महादेव बंडगर, बाभुळगावचे सरपंच भूषण पराडे-पाटील, जय पराडे, गणेश गाडेकर, सतीश काकडे, मेघराज ताटे, आकाश गवळी, ऋषी पराडे, कल्याण इंगळे, नरा इंगळे, अशोक पराडे, इंद्रजीत माने, बबन पवार, सचिन ताटे, लाला भोई, गणेश काळे, राजाभाऊ पराडे, बबन पराडे, नवनाथ इंगळे, प्रशांत पराडे, अमोल भोई, ओम पराडे, सिदू गायकवाड, किरण घाडगे, उमेश घोडके,संकेत इंगळे, महादेव भोई, तानाजी पराडे,सचिन इंगळे,उमेश घोडके, सागर पराडे, नितीन इंगळे,विकास भोई,शिवराज पराडे, प्रवीण पराडे, लाव्हा पराडे, महादेव भोई, तुषार भोई, दिपक भोई, आदित्य भोई, विशाल पराडे, गोविंद इंगळे, शुभम भोई, अक्षय पराडे, गणेश गायकवाड, हनुमंत पाटोळे, शिवतेज पराडे, सुभाष पराडे, सचिन भोई, अमित भोई, बापूराव पराडे, गणेश पराडे, बापू भोई, रोहित इंगळे इ. शिवसैनिक उपस्थित होते.



### 'रायुकाँ'च्या शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश सरचिटणीसपदी ॲड. रणवीर देशमुख

**नातेपुते** : येथील ॲड. रणवीर अमरशील देशमुख यांची महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना मुंबई येथे राज्याचे युवक अध्यक्ष मेहबूब शेख यांच्या हस्ते पत्र देण्यात आले. पद्मविभूषण खा. शरद पवार यांच्या विचारानुसार पुढील काळात राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार, माझी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांच्या माध्यमातून सर्वसामान्य युवकांच्या विकासात आपण भरीव कार्य करून, पक्ष संघटना मजबुतीने उभी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे देशमुख यांनी सांगितले. ॲड. रणवीर देशमुख यांच्या निवडीबद्दल सामाजिक राजकीय शैक्षणिक क्रीडा क्षेत्रातील तसेच इतर संस्थेतील पदाधिकाऱ्यांनी रणवीर देशमुख यांना शुभेच्छा दिल्या

### रमेश मेनकुदळे यांचे निधन



**सोलापूर** : येथील रमेश राचप्पा मेनकुदळे (वय ६१ वर्षे) यांचे सोमवार दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी अकस्मात निधन झाले. ते सिटी बस डेपो येथे मेकॅनिक म्हणून कामास होते.नुकतेच ते रिटायर झाले होते. परंतु त्यांची कामावर असलेली श्रध्दा, चिकाटी आणि अनुभव यामुळे त्यांना पुन्हा सिटी बस डेपो येथे सेवेत रुजू करून घेतले होते. रविवार दि. २५ ऑगस्ट रोजी त्यांनी आपली ड्युटी पूर्ण केली होती. रविवारी सकाळी अचानक त्रास होत असल्याने त्यांना हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि सून असा परिवार आहे.

# वीर धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग

## वालचंदनगर नातेपुते मार्ग वाहतुकीस बंद

**नातेपुते/प्रतिनिधी**

नीरा खोऱ्यात वीर, भाटघर, निरा देवघर, गुंजवणी धरणावर जोरदार पाऊस पडत आसल्याने वीर भाटघर धरण क्षेत्रातून दि. २५ ऑगस्ट रोजी सकाळपासून विसर्ग सुरू केला. वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून पाऊस वाढला असून पाण्याची जादा आवक होत आहे. त्यामुळे वालचंदनगर, नातेपुते मार्गावर निरा नदीच्या पुलावरून पाणी वाहू लागले आहे. नातेपुते पोलीस ठाणेचे सपोनि महारुद्र परजणे यांनी वालचंदनगर नातेपुते मार्ग वाहतुकीसाठी बंद करून त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे.

दि. २५ ऑगस्टपासून निरा नदीत वीर धरणाच्या निरा डाव्या कालव्याच्या अतिवाहकाद्वारे यापूर्वी सुरू करण्यात आलेला विसर्ग तसाच ठेवून वीर धरणाच्या सांडव्याद्वारे निरा नदीमध्ये २३,१८५ क्युसेक्स एवढा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

आता निरा नदीमध्ये काही काळ एकूण विसर्ग २३,३३५ क्युसेक्स होत आहे. पावसाचे प्रमाण व तीव्रता लक्षात घेता विसर्गामध्ये बदल करण्यात येईल. त्यामुळे नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी.



**नातेपुते** : वीर भाटघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून निरा नदीत पाणी सोडल्याने पुलावरुन पाणी जात अस्ल्याने, वालचंदनगर नातेपुते मार्ग वाहतुकीसाठी बंद करून त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त लावण्यात आला.

### पर्यायी मार्गाचा अवलंब करावा

नातेपुते पोलीस ठाणे, हद्दीतील नीरा नदीमध्ये वीर धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग होत असल्याने कुराबावी, कळंबोली गावामध्ये असलेल्या पुलावरून पाणी जात असल्याने सुरक्षाचे कारणावरून वाहतुकीस रस्ता बंद करण्यात आला असून वालचंदनगर, बारामतीकडे, जाणाऱ्या प्रवाशांना पर्यायी मार्गाचा अवलंब करावा.

**- महारुद्र परजणे,**
सपोनि नातेपुते पोलीस ठाणे.

कोणतेही अनुचित घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील, असे आवाहन कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण, जिल्हा सातारा यांनी केले आहे.

# अस्मिता अभियानात दीड हजार दिव्यांगांना फायदा

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

अक्कलकोट येथे शासनाकडून दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियानात घेण्यात आलेल्या शिबिरात विविध प्रकारचे मिळून दीड हजार दिव्यांगाना याचा फायदा झाला आहे.

अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे दि. २३ व २४ रोजी महसूल विभाग, पंचायत समिती, ग्रामीण रुग्णालय व दिव्यांग कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग तपासणी शिबिर घेण्यात आले. तालुक्यातील १ हजार ४२८ दिव्यांग व्यक्तींनी या उपक्रमात सहभाग नोंदविला. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व मुख्यकार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर झाला.

यावेळी तहसीलदार विनायक मगर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, बीडीओ शंकर कवितके, वैद्यकीय अधिक्षक डॉ. अशोक राठोड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विन करजखेडे, अमर दोडमनी, दयानंद परिचारक, डॉ. निखिल क्षीरसागर, डॉ. रोहन वायचळ, डॉ. बाबासाहेब सुलतानपुरे, डॉ. नीरज जाधव, किरण मंजुळ, महेश भोरे आदी जणांनी मिळून शिबीर यशस्वी केले.



**अक्कलकोट : दिव्यांग प्रमाणपत्र शिबिरात १५०० जणांना लाभ मिळाला. यावेळी डॉ. राठोड, डॉ. वायचळ, डॉ. सुलतानपुरे, डॉ. मिसाळ, डॉ. पावले, शंकर कुंभार, कर्मचारीवृंद व लाभार्थी.**

शिबिरात दिव्यांगांना शिबिराच्या ठिकाणी ने-आण करण्यासाठी वाहन व्यवस्था, व्हीलचेअरची व्यवस्था, वॉटर प्रुफ मंडप, स्वच्छ पिण्याचे पाणी, नाश्ता, जेवण, स्वच्छतागृहाची आदी व्यवस्था संयोजकाकडून करण्यात आले होते. दिव्यांगांसाठी असणाऱ्या शासनाच्या विविध योजनांच्या लाभाची माहिती व्हावी यासाठी तालुकानिहाय प्राथमिक आरोग्य केंद्र तथा ग्रामीण रुग्णालयात अशा एकूण २५ ठिकाणी दिव्यांग बोर्डाच्या तज्ञ डॉक्टरांमार्फत एकूण १५ हजार ६६६ व्यक्तींची दिव्यांगत्व तपासणी व निदान करून पात्र दिव्यांगत्व प्रमाणपत्र आणि वैश्विक ओळखपत्र, स्पिड पोस्टने घरपोच देण्याचे सोय करण्यात आल्याचे सांगण्यात आले. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या प्रचार प्रसिध्दी करण्यात येणार असून, आशा आणि यंत्रणेतील तालुका स्तरावरील संबंधित घटकांसाठी

सदर शिबिरात दृष्टीदोष १७५, श्रवणदोष २००, बौद्धिक अपंगत्व ३१३, अस्थिव्यंग ३९६, लहान मुलांचे व्यंग १५४ व इतर वैद्यकीय दोष १९० अशा विविध दिव्यांगांची तपासणी करण्यात आली आहे. यामध्ये पात्र लाभार्थ्यांना घरपोच प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. दिव्यांगांचे प्रकार व एकूण लाभार्थी दृष्टीदोष-१७५, श्रवण दोष-२००, बौद्धिक अपंगत्व-३१३, अस्थिव्यंग-३९६, लहान मुलांचे व्यंग १५४, वैद्यकीय दोष-१९० असे तब्बल १४२८ दिव्यांग प्रमाणपत्रासाठी पात्र ठरले आहेत.

माहितीचे बुकलेट तयार करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी विविध विभागांच्यावतीने माहितीचे स्टॉल लावण्यात आले होते. सोलापूर जिल्ह्यातील कार्यशाळा घेण्यात आले आहे. अशा प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती संचालक अभिजीत राऊत यांनी दिली.



**धाराशिव** : ऑल जर्नालिस्ट अँड फ्रेंड्स सर्कल पत्रकार संघटनेतर्फे दलितमित्र रमाकांत आर्ते यांना पुरस्कार प्रदातान करताना.

## धाराशिव येथे आधार सामाजिक संस्थेचा पुरस्कार देऊन सन्मान

**परंडा/प्रतिनिधी**

परंडा शहरातील विविध उपक्रम राबविणारी आधार सामाजिक संस्था जी महिलांना आधार महिला गृहोद्योगाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करुन देणे, संस्थेच्यावतीने अनाथ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे, महिलांच्या आरोग्यासाठी आरोग्य शिबीरे घेणे तसेच निराधार वृद्ध आजी/आजोबांसाठी आपला आधार वृद्धाश्रम चालविणे आदी समाजकार्यासाठी ऑल जर्नालिस्ट अँड फ्रेंड्स सर्कल रत्नागिरी या देशव्यापी पत्रकार मित्र संघटनेतर्फे आधार सामाजिक संस्थेला दलितमित्र रमाकांत आर्ते सामाजिक कार्य पुरस्कार मिळाला.

ज्येष्ठ पत्रकार कमलाकर कुलकर्णी, केंद्रीय अध्यक्ष गणेश कोळी, संस्थापक अध्यक्ष यासिन पटेल, ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक तु. दा. गंगावणे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना संस्थेचे अध्यक्ष झुल्फीकार काझी व कार्यकर्त्या ऊर्मीला गरड यांनी स्वीकारले.

# अभिनेता योगेश खिलारे याला राज्य शासनाचा कै. काशिनाथ घाणेकर पुरस्कार

**अकलूज/प्रतिनिधी**

कलाक्षेत्रात अभिनय व मेहनतीच्या जोरावर नाव कमावलेल्या व 'इंटरनॅशनल फालमफोक' या पहिल्याच मराठी चित्रपटातील पदार्पणातच उत्कृष्ट सिनेअभिनेता हा अत्यंत प्रतिष्ठेचा महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक विभागाच्यावतीने आयोजित केलेल्या ५९ वा महाराष्ट्र राज्याचा कै. काशिनाथ घाणेकर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेल्या अकलूजचा सुपुत्र अभिनेता योगेश खिलारे याला हा राज्यस्तरीय मराठी चित्रपटात पुरस्कार मिळाल्याबद्दल शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील व यांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने मार्गदर्शन संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, खा. धैर्यशील मोहिते-पाटील, माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील, संग्रामसिंह मोहिते पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

अकलूज येथील सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेला योगेश दादू खिलारे शालेय शिक्षण घेत असताना त्याला कला सादर करण्याची विविध व्यासपीठावर संधी मिळाली. प्रताप क्रीडा मंडळ माध्यमातून समूहनृत्य स्पर्धेत प्रा. सुभाष दळवी यांनी त्याला पहिली संधी दिली. पुढे अकलूजच्या शिक्षण प्रसारक मंडळाने आयोजित गौरव मराठी मातीचा व गौरव भारतीय लोककलेचा सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये एका गाण्यामध्ये भाजी विकणाऱ्या कलाकाराची भूमिका मिळाली होती. सदर भूमिका त्याने अत्यंत प्रभावीपणे व जीव ओतून पार पाडली व त्याने सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले होते.पुढे त्याने मिळालेल्या संधीचं त्याने सोनं करत गेला.



**अकलूज** : शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते अभिनेता खिलारे सत्कार करताना.

या कार्यक्रमास उपस्थित असलेले संस्थेचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी त्याचा अभिनय पाहून कौतुक केले व पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यामुळे पुढे संस्थेच्या अनेक लहान मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमामधून त्याला वारंवार कला सादर करण्याची संधी मिळत गेली. त्यातूनच त्याला प्रेरणा मिळाली. पुढे त्याने आजपर्यंत शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून सैराट या चित्रपटात आर्चीची भूमिका साकार करणारी रिंकू राजगुरू, स्वराज्य रक्षक संभाजी मालिकेत बहिर्जी नाईकाची भूमिका अत्यंत प्रभावीपणे करून चित्रपटसृष्टीत आपली ओळख निर्माण केलेले चित्रपट कलावंत अजय तपकिरे व सोमनाथ (कांबळे) वैष्णव, चित्रपट, दूरदर्शन व नाट्य क्षेत्रात दिग्दर्शक म्हणून नावलौकिक प्राप्त केलेले व सध्या मध्यप्रदेशमधील सेंट्रल युनिवर्सिटी, सागर येथे नाट्यशास्त्र विभागात सेवेत असलेले प्राध्यापक डॉ. अल्ताफ मुलाणी तसेच शंकरराव मोहिते महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ आवड व डॉ. अपर्णा कुचेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी चित्रपटाचे दिग्दर्शक प्रा. धीरज गुरव तसेच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी चित्रपट क्षेत्रात नावारूपाला आलेला चित्रपट दिग्दर्शक सहदेव घोलप, दिग्दर्शक क्षेत्रात योगीराज भिसे हे नाट्य, दूरदर्शन व चित्रपट दिग्दर्शक म्हणून आज नावारूपाला आले कलाकार आहेत.

या व्यतिरिक्त संस्थेचे अनेक विद्यार्थी दूरदर्शन, चित्रपट व नाट्य क्षेत्रात आज कार्यरत आहेत. या सर्वांच्या यशाच्या पाठीशी शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष जयसिंह शंकरराव मोहिते पाटील यांची दूरदृष्टी, प्रोत्साहन व मार्गदर्शन आहे.

# म. फुले युवा मंचच्यावतीने वृक्षारोपण

**▶▶ ३१५ हून अधिक वृक्षांची लागवड**
**▶▶ युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**



**लक्ष्मी दहिवडी : येथे वृक्षारोपणप्रसंगी म. फुले युवा मंच पदाधिकारी व कार्यकर्ते.**

**पंढरपूर/प्रतिनिधी**

बदलत्या निसर्गाने माणसांवर विचार करण्याची वेळ आणली आहे. आपण एकीकडे कल्पनेच्या पलीकडे गगनभरारी घेतली, प्रगती साध्य केली परंतु आपल्या कृतीने पर्यावरणाचा ऱ्हास होतोय याकडे मात्र दुर्लक्ष केले जात आहे. जागतिक तापमानातील वाढीमुळे पृथ्वीवरील मानवाचं, सजीवांचं अस्तित्व धोक्यात आलं आहे. वाढती लोकसंख्या, वाहनांचा अतिवापर त्यामुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणामुळे शहरात श्वास घेणं कठीण झालंय. शुद्ध हवा, ऑक्सिजन हवा असेल तर झाडांशिवाय पर्याय नाही म्हणून लक्ष्मी दहिवडी (ता. मंगळवेढा) येथील महात्मा फुले युवा मंचच्या युवकांनी गावातील अनेक ठिकाणी ३१५ हून अधिक वृक्षारांची लागवड करून सामाजिक संदेश दिल्याने महात्मा फुले युवा मंचचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील तरुणांना मार्गदर्शन पर उपक्रम राबवत असलेले महात्मा फुले युवा मंच यांनी रविवार दि. २५ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद विभागातील कर्मचारी नागन्नाथ गुंजेगावकर व पोलीस विभागातील विलास बनसोडे यांनी महात्मा फुले युवा मंच या सामाजिक संस्थेला वृक्षारोपण करण्यासाठी झाडे उपलब्ध करून दिली. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या वृक्षांची जेसीबीद्वारे खड्डे काढून रोप लावण्यात आली. दरम्यान ग्रामपंचायत च्या वतीने लावलेल्या झाडांना पाणी देणेसाठी मोफत टँकर उपलब्ध करून देण्यात आला.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
पत्ता - इंद्रभुवन, पुण्यश्लोक आबासाहेब वारद पथ.
रेल्वे लाईन्स, सोलापूर भूमी व मालमत्ता कार्यालय
ई-मेल - landestatesmc@gmail.com

जा.क्र.भूवमा/५१८ दि.२६/०८/२०२४

**ई निविदा सूचना क्र.०२**

सोलापूर महानगरपालिका हद्दीतील रंगभवन चौक येथील पब्लिक प्लाझाचे दुरूस्ती करून जाहिरातीकरिता भाडेतत्वावर चालविणे या कामाचे ई निविदा आय डी क्र.2024_SMC_1075212_1 ने दि.२६/०८/२०२४ पासून www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
व.मु.ले.
भूमी व मालमत्ता कार्यालय
सोलापूर महानगरपालिका

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग
इंद्रभुवन, रेल्वे लाईन्स, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, सोलापूर-४१३००१
ई-मेलः drainsmc@gmail.com टेलिफोन नं.:०२१७-२७४०३५०

जा.क्र./सा.आ.अ./ज.नि.९५२ दि.२३/०८/२०२४

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
जाहीर प्रसिद्धीकरणाचा मसुदा

सोलापूर महानगरपालिकेकडील सन २०२३-२४ सोलापूर जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनाअंतर्गत या बजेट सदरातून
Tender ID - 2024_SMC_1074267_1
Tender ID - 2024_SMC_1074296_1
Tender ID - 2024_SMC_1074277_1
या कामाचे टेंडर शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२३/०८/२०२४ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
सहा.अभियंता (ड्रेनेज विभाग)
सोलापूर महानगरपालिका सोलापूर

**नातेपुते नगरपंचायत नातेपुते**

दि.२६/०८/२०२४ जा.क्र.बांध/४८६/२०२४/न.पं.

**पाणीपुरवठा विभाग**

नातेपुते नगरपंचायत नातेपुते हे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून निविदा मागवित आहेत. अश्या प्रकारच्या कामाचा अनुभव असलेल्या ठेकेदाराकडून खालील कामासाठी निविदा मागवीत आहोत. तरी इच्छुक अनुभवी ठेकेदारांनी २ लिफाफा पध्दतीने निविदेत भाग घ्यावा.

लिफाफा क्र.१ मध्ये अंतर्भूत कागदपत्रे :- १) बयाणा पावती झेरॉक्स २) समतुल्य कामाचा अनुभव ३) संविदेमध्ये पदाधिकाऱ्यांचा समावेश नसलेबाबतचे प्रमाणपत्र १०० रू स्टॅम्पवरती ४) मागील वर्षाचे आयकर व इतर कर ना देय प्रमाणपत्र ५) सार्वजनिक बांधकाम विभाग खात्याचे नोंदणी प्रमाणपत्र (Registration Certificate) ६) निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र १०० रू स्टॅम्पवरती. ७) जिएसटी प्रमाणपत्र

लिफाफा क्र.२ मध्ये अंतर्भूत कागदपत्रे :- दरपत्रक

| अ . क्र. | कामाचा तपशील | कामाची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | कामाचा कालावधी | निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | रणजित काळे बिल्डिंग पासून चौधरी डॉक्टर यांचे घरापासून भूमिगत गटार करणे. | १,९९,१०१.०० | २००० | १ महिने | ५०० |

कोऱ्या निविदा नातेपुते नगरपंचायत, दि.२७/०८/२०२४ ते ०३/०९/२०२४ या कालावधी मध्ये उपलब्ध राहील. सदरहून कामाची निविदा नातेपुते नगरपंचायत येथे दि.०३/०९/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करावेत. निविदा शक्य झाल्यास दि.०४/०९/२०२४ रोजी सायंकाळी ६.०० वा. उघडण्यात येतील.

निविदा फॉर्म विक्री, स्वीकृतीची कार्यवाही वरील कालावधीत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळता) नातेपुते नगरपंचायत येथे कार्यालयीन वेळेत करण्यात येईल. निविदा बाबत सर्व तपशील / माहिती/ अटी व शर्ती निविदा फॉर्ममध्ये नमूद केलेली आहे. तसेच अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

सही/- सौ.अनिता नं.लांडगे, नगराध्यक्ष नगरपंचायत नातेपुते
सही/- श्री.मालोजीराजे देशमुख उपनगराध्यक्ष नगरपंचायत नातेपुते
सही/- सौ.भारती बा.पांढरे सभापती पाणीपुरवठा विभाग नगरपंचायत नातेपुते
सही/- श्री.माधव लक्ष्मण खांडेकर मुख्याधिकारी नगरपंचायत नातेपुते

## संक्षिप्त वृत्त



रा. काँ. शरदचंद्र पवार पक्षाचे नेते उत्तमराव जानकर यांची विशेष निरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करताना माजी आमदार रमेश कदम व इतर मान्यवर.

### माजी आमदार रमेश कदम यांच्यातर्फे उत्तमराव जानकर यांचा सन्मान

**वेळापूर** : वेळापूर गरुड बंगला येथे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी, शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती उत्तमराव जानकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पार्टीच्या मोहोळ (सोलापूर) विधानसभा मतदारसंघाच्या विशेष निरीक्षकपदी नियुक्ती झाल्याबद्‍ल, मोहोळ विधानसभेचे माजी आमदार रमेश कदम यांनी आपल्या सहकाऱ्यांसह सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांच्यावतीने उत्तमराव जानकर यांचा सन्मान करण्यात आला.

---

### सोलापुरातील क्रीडा शिक्षकांचा नाशिकात गौरव







**वेळापूर** : शिवछत्रपती वर्कर्स स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आयोजित आदर्श क्रीडा शिक्षक महाराष्ट्र गौरव पुरस्कार नाशिक येथे पार पडले. यामध्ये सोलापुरातील श्रीधर गायकवाड, नेताजी पवार, रवींद्र चव्हाण यांना प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार सीमा हिरे यांच्या हस्ते तीन क्रीडा शिक्षकांना देऊन हा पुरस्कार प्रदान करून गौरवण्यात आले. याप्रसंगी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त राजेंद्र निंबाळते, पोलीस उपनिरीक्षक गणेश न्याहाळदे, भाजपा महानगर प्रमुख प्रशांत जाधव वर्कर्स स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे आयोजक उत्तम उघडे, नगरसेविका पुष्पा अवार्ड, नगरसेवक दिनकर पाटील यांची उपस्थिती होती.

---

### फुरडे इन्फोटेक आयटी कंपनीचा सोलापुरात शुभारंभ

**सोलापूर** : बांधकाम क्षेत्रात गेल्या तीन दशकांमध्ये नाव कमावलेल्या फुरडे ग्रुपने आता आयटी क्षेत्रात पाऊल टाकले आहे. फुरडे इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड या आयटी कंपनीचा शुभारंभ बुधवार दि. २८ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० वाजता दमाणी नगर नगर येथे करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रमुख रोहन फुरडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खा. प्रणिती शिंदे, माजी आमदार दिलीप माने आणि लक्ष्मी हायड्रोलिक्सचे व्यवस्थापकीय संचालक शरद ठाकरे आदी उपस्थित राहणार आहेत. सोलापुरातील युवकांना जन्मभूमीतच कर्मभूमी निवडण्याचे संधी या माध्यमातून मिळणार आहे.

या कंपनीच्या माध्यमातून सुमारे ७० युवकांना रोजगार मिळणार आहे. या ठिकाणी बीपीओ, केपीओ स्वरूपात कामकाज चालणार आहे. यात पत्रकार परिषदेला सुनील फुरडे, रोहीत फुरडे, आनंद मार्डीकर, आसिफ बागवान, दिगंबर कोनापुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# बदलापूर प्रकरणातील आरोपीला तात्काळ फाशी द्या

## जिजाऊ ब्रिगेडची मागणी



कुर्डवाडी : बदलापूर प्रकरणातील आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी माढा तालुका जिजाऊ ब्रिगेडच्यावतीने प्रांत अधिकारी आंबेकर यांना निवेदन देण्यात आले.

**कुर्डूवाडी/प्रतिनिधी**

राज्यातील आपल्या लाडक्या बहिणी व भाच्चींना संरक्षण द्या व बदलापूर प्रकरणातील आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी माढा तालुका जिजाऊ ब्रिगेडच्यावतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आली. याचे निवेदन कुर्डूवाडी प्रांतकारण्यांना देण्यात आले.

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथील शाळेत चार वर्षाच्या दोन विद्यार्थ्यांवर अमानुषपणे लैंगिक अत्याचार करण्यात आले, ही घटना इतकी भयावह आहे की, 'राज्यातील आम्हा महिलांना दिवसा घराबाहेर पडावे की नाही असे भितीदायक वातावरण निर्माण झाले आहे. मुलींना शाळेत पाठवायला भिती वाटत आहे. आम्ही किती दिवस अशा अत्याचाराच्या निषेधार्थ मेणबत्ती जाळायची. एकदा अत्याचारातील आरोपींला जाळू या. मग बघा पुन्हा कुणाचेही हात आपल्या लाडक्या बहिणींच्या व भाच्चींच्या इज्जतीकडे जाताना धजावणार नाही अशा आशयाचे निवेदन उपविभागीय अधिकारी प्रियंका आंबेकर यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जिजाऊ ब्रिगेड माढा तालुक्याच्यावतीने बाल चिमुकली काव्या खटके हिच्या हस्ते देण्यात आले.'

यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्षा निता खटके, आशा टोणपे, तालुका सचिव अरूणा पाटील, शहराध्यक्षा प्रफुल्लता मोहिते, मनिषा गाडे, भाग्यश्री पाटील, सिमा रजपूत, संगिता भोसले यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

**मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

बदलापूर घटनेतील आरोपींचा तात्काळ चौंरगा करावा म्हणजेच कायद्यानुसार फाशीची शिक्षा द्यावी ही आमची मुख्यमंत्र्यांकडे मागणी आहे.

**- नीता खटके, तालुकाध्यक्षा, जिजाऊ ब्रिगेड.**



सोलापूर : सिद्धनाथ शुगर मिलचे व्यवस्थापक जाधव यांना डीएसटीच्यावतीने लाईफ टाइम अॅचिव्हमेंट पुरस्कार दुग्धविकासमंत्री व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते स्विकारताना.

# संजीवकुमार जाधव यांना डीएसटीचा लाईफ टाइम अॅचिव्हर पुरस्कार

**उत्तर सोलापूर/प्रतिनिधी**

बेलाठी येथील सिद्धनाथ शुगर मिलचे व्यवस्थापक संजीवकुमार जाधव यांना डीएसटीच्यावतीने लाईफ टाइम अॅचिव्हमेंट पुरस्कार महसूल व दुग्धविकासमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते दि. २४ ऑगस्ट रोजी डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट असोसिएशनचे ६९वे वार्षिक अधिवेशनमध्ये पुणे येथे हॉटेल जेडब्ल्यू मॅरेटच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये देण्यात आले. डीएसटीए ही देश पातळीची सात राज्यांमध्ये चालणारी साखर व्यवसायाविषयीची नवीन तंत्रज्ञान व माहिती पुरवण्याचं काम करणारी संस्था आहे.

दरवर्षी साखर व्यवसायात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींना व तंत्रज्ञांना पुरस्कार देऊन सन्मानित करते. संजीवकुमार जाधव यांना डीएसटीच्यावतीने 'लाईफ टाईम अॅचिव्हमेंट' अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

संजीवकुमार जाधव हे कंचेश्वर शुगर लिमिटेड मंगरूळ, तुळजापूर व सिद्धनाथ शुगर लिमिटेड, सोलापूर याची पहिल्या दिवसापासूनची सर्व प्रकारची सरकारी मान्यता, आर्थिक जुळवाजुळव, कर्ज उभारणी, पडताळणी व अत्यंत कार्यक्षम पद्धतीने हे कारखाने चालवलेले आहेत. तसेच जाधव यांनी २७ वर्षाच्या अनुभवामध्ये १२ कारखान्याची उभारणी केली असून व्यवस्थितरित्या चालवलेली आहे. ही त्यांची उपलब्धता पाहता त्यांच्या कार्याची दखल घेऊन डीएसटीएने पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

यावेळी एनसीडीसी नवी दिल्लीचे चेअरमन-प्रकाश नाईक नवरे, एनसीडीसीचे मॅनेजिंग डायरेक्टर-शहाजी भड, चेअरमन डीएसटीए-शिरगावकर व्हाईस चेअरमन, साखर व्यवसायातील मान्यवर, तंत्रज्ञ उपस्थित होते. संजीवकुमार जाधव यांनी २७ वर्षाच्या सेवेत जवळपास १३ साखर कारखाने उभारणी केली आहे.

त्यामध्ये सिद्धनाथ, कंचेश्वर इतर कारखान्याची धुरा सांभाळत आर्थिक नियोजन, उत्पादन व उत्पन्न याचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे.

# महादेव कोगनुरेंच्या जनता दरबारात सामान्यांना मिळतोय न्याय

**दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी**

एम. के. फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा दक्षिण सोलापूर काँग्रेसचे जनसेवक महादेव कोगनुरे यांनी सध्या दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षांकडून निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. यासाठीच जनसेवक महादेव कोगनुरे यांनी गेल्या सहा महिन्यांपासून सर्वसामान्य माणसांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सोलापूर येथे दररोज जनता दरबार भरविण्यात येत आहे.

या जनता दरबारमध्ये महादेव कोगनुरे यांनी आपले सर्व काम बाजूला ठेवून सामान्य माणसांचे प्रश्न जागेवरच कसा मार्गी लावता येईल यासाठी अथक परिश्रम घेताना दिसतात. जनता दरबारच्या माध्यमातून



दक्षिण सोलापूर : येथे महादेव कोगनुरे यांच्या जनता दरबारात झालेली सर्वसामान्यांची गर्दी.

सर्वसामान्य माणसांच्या विविध समस्या जागेवरच सोडविण्यात येत असल्याने दिवसेंदिवस महादेव कोगनुरे यांच्या जनता दरबारला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभताना दिसून येत आहे.

दररोज दक्षिण सोलापूर तालुक्यातील बहुसंख्य नागरिक जनता दरबारला उपस्थिती लावून आपले प्रश्न आणि समस्या महादेव कोगनुरे यांच्यासमोर मांडतात. यात सामान्य शेतकरी, महिला, मजूर, शहरातील नागरिक तसेच युवकांचा मोठा प्रतिसाद या जनता दरबारला मिळत आहे.

सध्या सोलापूर जिल्ह्यातच दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील नेते आणि कार्यकर्ते सध्या अॅक्टिव्ह झाल्याचे दिसून येत आहे. महादेव कोगनुरे यांना निवडून आणण्यासाठी कार्यकर्ते सध्या निवडणूक हातात घेण्यासाठी सज्ज झाल्याचे बोलले जात आहे.

जनता दरबार, कृषि मेळावा, मोफत आरोग्य शिबीर, जळीतग्रस्तांना मदतीचा हात तसेच शैक्षणिक, सामाजिक आदी समाजोपयोगी कार्यातून पाहिल्यास दक्षिणमध्ये महादेव कोगनुरे यांचे राजकीय वर्चस्व वाढल्याचे बोलले जात आहे. महादेव कोगनुरे यांनी जनतेचा विश्वास संपादन करण्यात यशस्वी झाल्याचे दिसून येत आहे. यामुळेच महादेव कोगनुरे यांच्या जनता दरबारला नागरिकांचा गर्दी होताना दिसून येत आहे.



अक्कलकोट : तालुका काँग्रेस अध्यक्ष शंकर म्हेत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त आझम शेखजी यांच्या रक्ताने बनवलेला (स्केच) कलाकृती भेट देण्यात आला.

# रक्ताने बनविला म्हेत्रे यांचा स्केच

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

तालुक्याचे दानशूर कर्ण, अक्कलकोट तालुका काँग्रेस अध्यक्ष शंकर म्हेत्रे यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त दुधनी सामाजिक कार्यकर्ते आझम शेखजी यांच्या रक्ताने बनवलेला (स्केच) कलाकृती भेट देऊन शंकर म्हेत्रे यांच्या वाढदिवस साजरा करण्यात आला.

याप्रसंगी मुस्लीम समाजाचे अध्यक्ष जिलानी नाकेदार, तोलासाब गुलबर्गा, हाजी रौफ साब नदाफ, अल्लाउद्दीन नदाफ, सामाजिक कार्यकर्ते आझम शेखजी, महिबूब बिल्लाड, सैयद शेख, महिबूब शेखजी, अल्लाबक्ष जिडगे, गौस शेखजी, अशपाक शेखजी, मेहराज जिडगे, मोसीन मुकादम, राज गौडगाव आदी उपस्थित होते.

# कष्टातून उभ्या राहिलेल्या श्री लक्ष्मी दुग्धालयाचा नावलौकिक




अक्कलकोट : अक्कलकोट-सोलापूर रस्त्यावरील हेच ते सुप्रसिध्द श्री लक्ष्मी दुग्धालय

## मुंबई-पुण्यासह प्रदेशातही दुग्धालयाचा बोलबाला

**येथील श्री लक्ष्मी दुग्धालय येथे चुलीच्या भट्टीवरील नॅचरल मलईयुक्त शुद्ध ओरिजनल दुग्धजन्य पदार्थ मिळत असल्याने येथील पदार्थ मुंबई पुण्यासह दुबईपर्यंत पोहचले आहेत. श्री स्वामी समर्थ महाराज आणि गाणगापूर श्री दत्तात्रय महाराज दर्शनासाठी जाणारे येणारे भाविक-भक्त याठिकाणी आवर्जून माल खरेदी करण्यासाठी प्रचंड गर्दी करत असतात. यामुळे लक्ष्मी दुग्धालय नॅचरल मलईयुक्त दुग्धजन्य पदार्थ आणि स्वीट मार्टचे नाव आज सगळीकडे पोहचले आहे.**

---

अक्कलकोट-सोलापूर महामार्ग, ब्यागेहळ्ळी फाटाच्यापुढे, तोतला फार्म हाऊस शेजारी अक्कलकोट-सोलापूर रस्त्यावर श्री लक्ष्मी दुग्धालय नॅचरल मलईयुक्त दुग्धजन्य पदार्थांचा कारखाना सुरू करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील छोटासा भोसगा या गावातील गरीब शेतकरी कुटुंबातील रेवणसिध्द पाटील हे शांत संयमी, आपुलकी, जिद्द व चिकाटीने अविरतपणे दुग्ध व्यवसाय सुरू केला आहे. उसनवारीबरोबरच फायनान्सकडून मोठ्या प्रमाणात कर्ज काढून या टोलेजंग व्यवसायाला कष्टाने जिद्दीच्या जोरावर एक नंबर, स्वच्छ कारभार करत दूध डेअरी व्यवसायाचा पाया रोवला. जवळपास गेल्या वीस ते पंचवीस वर्षांपासून व्यवसाय अविरतपणे सुरू आहे. केवळ दूध विक्री करण्यापेक्षा बदलती बाजारपेठ व ग्राहकांची मागणी ओळखून प्रक्रियायुक्त उत्पादन निर्मितीत त्यांनी प्रवेश केला आहे. ग्राहकांच्या समाधानात आपले समाधान असते म्हणून गुणवत्तेबरोबर ताजी उत्पादने तयार करून दिल्याने ग्राहकांकडून वाढती मागणी होत आहे. परिवाराबरोबरच सध्या येथे जवळपास ७० कामगार काम करतात. तसेच दूध संकलन करून आणून देणारे ५० गवळ्यांना सांभाळण्यात पाटील यांचा सिंहाचा वाटा आहे.

शाबू, बटाटा चिवडा, डिंक लाडू, चिप्स, नाष्टा समोसा, ढोकळा, मका चिवडा, भडंग चिवडा, फरसाण आदींची मागणीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. यामुळे अक्कलकोट शहर व तालुक्यात, जिल्ह्यात लक्ष्मी डेअरी नावाचा ब्रँड तयार झाला आहे. निर्मितीसाठी स्वतः मालक रेवणसिध्द पाटील यांनी कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेतलेले नाही. पण शिक्षण व अभ्यासाला याची अट लागत नाही. फक्त जिद्द, चिकाटी हीच गोष्ट महत्त्वाची असते. उत्पादने तयार करताना एखादी चूक झाल्यास ती पुन्हा होणार नाही याची काळजी घ्यायची. विक्री कशा पद्धतीने वाढवता येईल याचा विचारविनिमय सर्वजण मिळून करतात.

**सुरुवातीला**

**एक ते दोन किलो श्रीखंड तयार करायचो, त्याची चव पाहायचो. परिवारातील मित्रमंडळींना ते चवीसाठी द्यायचो, त्यातून येणारे बदल स्वीकारायचे असे नित्यनियमाने चालायचे. दर्जा टिकवण्यासाठी ग्राहकांकडून सल्ले देखील घेतले. यात प्रशिक्षित होण्यास सहा महिन्यांचा कालावधी गेला. अक्कलकोट तालुका हा दुष्काळी तालुका असल्याने जनावरांची संख्या कमी आहे. जवारी गाय व म्हशीचे शुध्द नॅचरल ओरिजनल दूध मिळणे अवघड आहे. बाजारात उत्तम दर्जेदार क्वालिटी टिकविण्यासाठी जास्तीचे भाव देऊन दूध संकलन करत आहे.**

**- प्रो. प्रा. रेवणसिध्द पाटील**



यामुळे ग्राहकांकडून नॅचरल मलईयुक्त दुग्धजन्य पदार्थ, स्विट व स्नॅक्ससह मलईयुक्त ताक, मठ्ठा, लस्सी, बासुंदी, श्रीखंड, आम्रखंड, पनीर, खवा, सुगंधी दुध, चक्का, मलई पेडा, बर्फी, कुंदा, लाडू, बालुशाही, काजुकतली, तसेच नॅचरल फळयुक्त मँगो रबडी, अंजीर रबडी, पेरू रबडी, स्ट्रॉबेरी रबडी, अंगूर रबडी, चिकू रबडी, सिताफळ रबडी, काळाद्राक्ष रबडी, जांभाळ रबडी, गुलकंद रबडी, अमूल बटर, चौज, ग्रीन पिस, मिक्स व्हेजिटेबल, स्वीट कॉर्न (मका), पनीर मसाला, शेंगा चटणी, कडक भाकरी, बाकरवडी, बेकरी पदार्थ ब्रेड, टोस्ट, खारी, बटर, बनपाव, मस्कापाव, नानकटाई बिस्कीट, उपवासाचे शाबू पापड येथे शुध्द क्वालिटीचे दुग्धजन्य पदार्थ मिळत असल्याने बेकरी, हॉटेल, ढाबा, लग्न समारंभ, केटरिंग, वाढदिवसानिमित्त कार्यक्रम आदींच्या माध्यमातून उत्पादनांना वर्षभर मागणी असते. रेवणसिध्द पाटील यांचा उत्तम दर्जेदार व्यवसायाची इतर आदर्श तरुणांनी घेण्यासारखा आहे. दररोज सुमारे ३००० लीटर दुधावर प्रक्रिया केली जाते. हंगामात हाच आकडा ५ हजार लीटरवर जातो.



अक्कलकोट : श्री लक्ष्मी दुग्धालयाचे मालक रेवणसिद्ध पाटील यांच्या समवेत दूध संकलन करणारे गवळी बंधू.

**कष्टातून यशाकडे वाटचाल**

आजच्या युवकांनी भरकट न जाता आपण कोणतेही काम करा तेपण श्रध्दा, प्रामाणिक आणि क्वालिटी प्रमाणे काम केल्यास आपणास आपल्या कामात १०० टक्के यश प्राप्त होते. आमचा अक्कल्कोट तालुका हा दुष्काळी भाग असून, आजपर्यंत आम्हाला श्री स्वामींचे आशिर्वाद आणि स्वकष्टामुळे आम्ही व्यवसायात गरुड झेप घेतली आहे. आजच्या नवीन पिढीनी आमची प्रेरणा घेवून व्यवसायात उतरावे.

सध्या अक्कलकोट येथील मंगरुळे हायस्कूल चौक, बायपास रोड, जंगी प्लॉट, टोळ अंबाबाई मंदिराजवळ, भारत गॅस गोडाऊन शेजारी, स्टेशन रोड, अक्कलकोट-सोलापूर महामार्ग, ब्यागेहळ्ळी फाटाच्यापुढे, तोतला फार्म हाऊस शेजारी अक्कलकोट-सोलापूर रोड आदी ठिकाणी अक्कलकोट शहरात विक्री केंद्रे सुरू आहेत. याशिवाय कलबुर्गी जिल्ह्यातील आळंद तालुक्यातील मादनहिप्परगा येथे पण दुधविक्री केंद्र चालू आहे.

✻ संकलन ✻

रविकांत धनशेट्टी (९७६५०६३७५३)
(अक्कलकोट तालुका प्रतिनिधी)

## संक्षिप्त वृत्त

### रोपळेत गुरुवारी युवा सेना दहीहंडी महोत्सव



**✔ पंढरपूर** : पंढरपूर तालुक्यातील रोपळे परिसरातील नागरिकांना दहीहंडीचा थरार अनुभवण्याची संधी महादेव काका मित्र मंडळाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली असून युवा सेनेचे पंढरपूर तालुकाप्रमुख महादेव भोसले यांच्या संकल्पनेतून गुरुवार दि. २९ रोजी सायंकाळी सहा वाजता युवा सेना दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे. आपली सामाजिक कर्तव्यनिष्ठ जोपासत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे, युवा सेना सचिव किरण साळे, शिवसेना व युवा सेनेचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महादेव काका मित्र मंडळाच्या वतीने आतापर्यंत सामाजिक, शैक्षणिक, वृक्षारोपण, गरजूंना मदत करणे असे अनेक उपक्रम राबविण्यात आले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सर्वसामान्य नागरिकांनाही दहीहंडीचा थरार अनुभवता यावा या उद्देशाने रोपळे येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे गुरुवार दि. २९ रोजी सायंकाळी सहा वाजता युवा सेना दहीहंडी महोत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. दहीहंडी फोडणाऱ्या गोविंदाच्या पथकास ३१ हजार रुपयांचे पारितोषिक सोमनाथ शिवाजी लोखंडे यांच्या वतीने ठेवण्यात आले आहे. हा दहीहंडी महोत्सव यशस्वी करण्यासाठी शिवप्रेमी तरुण मंडळ, चॅलेंज ग्रुप, न्यू गोल्डन तरुण मंडळ, शिवतेज तरुण मंडळ, राजे शिवाजी चौक तरुण मंडळ, संत सावता माळी तरुण मंडळ, राजमाता अहिल्यादेवी होळकर तरुण मंडळ, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ संघर्ष ग्रुप, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव मंडळ, राजे उमाजी नाईक तरुण मंडळ आदी परिश्रम घेत आहेत.
तरी आयोजित करण्यात आलेल्या या युवा सेना दहीहंडी महोत्सवासाठी सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन महादेव काका भोसले मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

---



**करमाळा : विद्यार्थीनी कु. प्राजक्ता हिंगसे हिने प्रथम क्रमांक पटकावला झाल्याबद्दल सत्कार करताना मान्यवर.**

### कु. प्राजक्ता हिंगसे योगासन स्पर्धेत तालुक्यात प्रथम

**✔ करमाळा** : सोमवार दि. २६ रोजी महात्मा गांधी विद्यालय, करमाळा येथे पार पडलेल्या ट्रॅडिशनल योगा स्पर्धामध्ये श्री. गिरधरदास देवी विद्यालय, करमाळाची विद्यार्थीनी कु. प्राजक्ता हिंगसे ने करमाळा तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला व तीची जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल कु. प्राजक्ता हिंगसे व क्रीडा शिक्षक जितेंद्र शिंदे यांचे प्रशालेचे अध्यक्ष न्हैयालाल देवी, सचिव अमोद शेठ संचेती, संचालिका सुनीताभाभी देवी, संचालक विजयकुमार दोशी, चंद्रकांत देवी, मुख्याध्यापक संभाजी जगताप सर सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# अक्कलकोट, दक्षिण भटक्या विमुक्तसाठी २२८ घरकूल मंजूर

## आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पाठपुराव्याला यश

✔ दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी

**विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील घटकांसाठी दक्षिण सोलापूर तालुक्यातील १५९ व अक्कलकोट तालुक्यात ६९ असे एकूण २२८ घरकुले आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नामुळे मंजूर झाले असल्याचे व त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असल्याची माहिती तांडा वस्ती सुधार योजनेचे जिल्हाध्यक्ष संदीप राठोड यांनी दैनिक सुराज्यशी बोलताना सांगितले.**

अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील भटक्याविमुक्त जाती जमातीच्या समाजाचे राहणीमान उंचावे व त्यांचे आर्थिक स्त्रोत वाढावे त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी म्हणून त्यांना जमीन उपलब्ध करून देणे वसाहत उभी करून देणे व त्या ठिकाणी त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण बनवणे याकरिता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत आपण शासन दरबारी प्रयत्न करत होतो त्यासाठी आमदार सचिन



आ.सचिन कल्याणीशेट्टी



संदीप राठोड

कल्याण शेट्टी यांनी याची दखल घेऊन या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील २२८ वैयक्तिक लाभार्थ्यांना या घरकुल योजनेचा लाभ होणार असल्याचे ही संदीप राठोड यांनी सांगितले. सदर योजनेतून वैयक्तिक घरकुल बांधकाम तसेच सामूहिक वसाहतीचे प्रकल्प यासाठी अनुदान देण्यात येते. या अनुदानाचा उपयोग लाभार्थ्यांना मिळावा यासाठी आपण सातत्याने प्रयत्न करत होतो. आज ही घरकुले मंजूर झाल्यामुळे आपल्याला आनंद झाल्या असल्याचे यावेळी संदीप राठोड यांनी सांगितले.

या योजनेअंतर्गत प्रति लाभार्थी एक लाख वीस हजार निधी मिळणार आहे मंजुरी मिळताच शासनाने एक कोटी वीस लाख रुपये इतका निधी वितरित ही केला आहे. सन २०२० रोजी शासन दरबारी आपण प्रस्ताव पाठवला होता परंतु त्याला मंजुरी मिळत नव्हती परंतु आमदार कल्याणशेट्टी त्यांच्या पाठपुराव्यामुळे यश मिळाले.

## मुलांवर महिला सन्मानाचे संस्कार घडवा : खा. प्रणिती

### छायाचित्रकार, कॅमेरामन यांचा सन्मान



**सोलापूर : छायाचित्रकार, पत्रकार यांच्यासमवेत खा. प्रणिती शिंदे.**

✔ सोलापूर/प्रतिनिधी

महिला व मुलींचा सन्मान, आदर केला पाहिजे. ही शिकवण शाळांमध्ये दिली जात नाही मात्र घरोघरी आता मुलांवर महिलांचा सन्मान करण्याचे संस्कार घडविले पाहिजे. तरच महिलांवर अन्याय, अत्याचाराच्या घटना घडणार नाहीत असे आवाहन करतानाच छायाचित्रकार हे अविस्मरणीय क्षण टिपतात. ते तत्व आणि मूल्य पाळतात, असे प्रतिपादन खा. प्रणिती शिंदे यांनी येथे केले.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि सोलापूर जिल्हा वडार समाज खाण कामगार समाजसेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक छायाचित्र दिनानिमित्त माध्यमातील छायाचित्रकार आणि कॅमेरामन यांचा सत्कार समारंभ सोमवारी सकाळी खा. प्रणिती शिंदे यांच्या हस्ते पार पडला.

त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी सोलापूर जिल्हा लेबर फेडरेशनचे चेअरमन शंकर चौगुले, खाण संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण विटकर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

खा. प्रणिती शिंदे पुढे म्हणाल्या, एक छायाचित्र पाहिले की सर्व काही समजते. एवढे प्रभावी छायाचित्र असते.

अनेक अविस्मरणीय क्षण छायाचित्रकार टिपतात. छायाचित्राच्या माध्यमातून आत्मपरीक्षणही केले जाते. छायाचित्रामागे संघर्षाची कहाणी असते. छायाचित्रकारांची भूमिका आव्हानात्मक आणि संघर्षात्मक आहे.

छायाचित्रकार हे आजच्या काळातही आपले तत्व आणि मूल्य जपतात. यावेळी मान्यवरांच्या हस्ते छायाचित्रकारांना भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक विक्रम खेलबुडे यांनी केले. किरण बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले तर चिटणीस आफताब शेख यांनी आभार मानले.



**पंढरपूर : निशिगंधा बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना कल्याणराव काळे.**

## निशिगंधा बँकेस ४२.३५ लाखांचा नफा, सभासदांना देणार ९ टक्के लाभांश

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

येथील निशिगंधा बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन् आर. बी. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी सभासदांना ९ टक्के जाहीर करण्यात आला. गत चौदा वर्षात निशिगंधा बँकेने सभासद व ठेवीदारांची विश्वासार्हता जपत कल्याणराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली समाधानकारक प्रगती केली आहे.

यावेळी बँकेचे मार्गदर्शक व संचालक कल्याणराव काळे यांनी गेल्या चौदा वर्षाचा बँकेच्या प्रगतीचा आढावा सभासदांसमोर ठेवला आणि लवकरच बँकेची स्वमालकिची इमारत उभी करण्याचा मानस बोलून दाखविला, यावेळी व्हा. चेअरमन् सतिश लाड, संचालक देविदास सावंत, बी बी सावंत, डॉ. मंदार सोनवणे, भागवत चवरे, वैभव साळुंखे, महेश पटवर्धन, अनिल निकते संचालिका रवव. सौ. क्रांती कदम, सौ. शोभा येडगे उपस्थित होते. यावेळी आदर्श सभासद म्हणून गोपाळ शिंदे, दत्तात्रय लोकरे, महेश काळे, संभाजी नाईकनवरे, अविनाश गव्हाणे, अर्जुन झांबरे, समीर बागवान श्रीमती अलका घाडगे, सौ. वैशाली बिडकर या मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

सभेच्या पुर्वी एक तास सभासदांसाठी आयोजित केलेल्या सभासद प्रशिक्षण वर्गामध्ये सहकार प्रशिक्षण केंद्र, शाखा सोलापूर यांचे प्रतिनिधी जितेंद्र चव्हाण यांनी सभासदांचे हक्क व कर्तव्ये, याबाबतची सखोल माहिती यावेळी उपस्थितांना दिली.

निशिगंधा सहकारी बँकेच्या सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील कामकाजाचा आढावा घेताना कल्याणराव काळे म्हणाले कि, मार्च २०२४ अखेर बँकेचे ४८३६ सभासद असून बँकेकडे रू. ३६.५० कोटींच्या ठेवी असून, रू.१९.९७ कोटींचे कर्जवाटप केलेले आहे व रू.१५.८८ कोटींची गुंतवणूक केली आहे. चालू अर्थिक वर्षात बँकेस रू.४२.३५ लाख रूपयांचा नफा झालेला आहे लवकरच बँकेचे एटीएम सुरू होत असून आण्णासाहेब पाटील महामंडळाच्या योजनेतून बँकेने १५० तरूण उद्योजकांना रू.१२ कोटींचा कर्ज पुरवठा केलेला असून या योजनेतून लाभार्थ्यांना रू.१.२५ कोटी चा व्याज परतावा मिळालेला आहे. या योजनेचा तरूणांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा तसेच अल्प व्याजदरात सोनेतारण, सी टी एस चेकबुक, आरटीजीएस, एनएफईटी, ई-पेमेट, तसेच शाख्या भाळवणी येथे सेफ डिपॉझिट लॉकर्स ची सोय इ. सेवा बैंक देत आहे त्याचा लाभ सर्व सभासदांनी घ्यावा.

सभेच्या सुरूवातीस श्री. विठ्ठलाच्या प्रतिमेचे पूजन जेष्ठ सभासद श्रीमती मुक्ताबाई पिसे, नितीन ताड व इतर मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

# शास्त्रीनगर भागात मुलभूत सुविधा न दिल्यास ठिय्या आंदोलन

## वाहिद बिजापुरे यांचा इशारा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

प्रभाग १७ शास्त्रीनगर भागात होणारा अपुरा आणि गढूळ पाणी पुरवठा, रस्ते दुरुस्ती, दिवाबत्ती, ड्रेनेज, घंटागाडी आदी मुलभूत समस्यांकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. या समस्या त्वरित न सोडवल्यास महापालिकेत ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा सोलापूर शहर मध्य विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष वाहिद बिजापुरे यांनी दिला आहे.

प्रभाग १७ मधील विविध समस्यांबाबत वाहिद बिजापूरे व युवक कॉंग्रेसचे सोलापूर जिल्हा प्रभारी सरफराज काजी यांच्या नेतृत्वाखाली ुनम गेटवर मोर्चा काढून सोलापूर महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांना निवेदन देण्यात आले.

उजनी धरण शंभर टक्के भरूनही शास्त्री नगर भागातील अनेक ठिकाणी रात्री बेरात्री आणि अपुरा अशुध्द पाणीपुरवठा होत आहे. परिसरतील रस्त्याची वाट लागली असून रस्ते दुरुस्ती केले जात नाहीत. अनेक गल्ली बोळातील लाईट बंद असून दिवाबत्ती दुरुस्ती केली जात नाही. ड्रेनेज भरून मैलामिश्रीत पाणी रस्त्यावर वाहत आहे. कामगारांची वस्ती असल्यामुळे कचरा मोठ्या प्रमाणात निर्माण होते तो उचलले जात नाही. घंटागाडी अनेक दिवस येत नाही. या व इतर अनेक समस्यांनी शास्त्री नगर भाग वेढला आहे. याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. अधिकाऱ्यांनी प्रभाग १७ शास्त्री नगर भागातील नागरीकांना दिलासा द्यावा. अन्यथा सोलापूर महानगरपालिकेवर भव्य मोर्चा काढून महानगरपालिकेत बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा सोलापूर वाहिद बिजापुरे यांनी दिला आहे.




**सोलापूर : विविध मागण्यांबाबत काढण्यात आलेल्या मोर्चात सहभागी झालेले वाहिद बिजापूरे व प्रभाग १७ मधील नागरिक.**

## शहरात दुचाकी चोरट्यांचा सुळसुळाट

### तीन ठिकाणच्या दुचाकी पळवल्या

**✔ सोलापूर** : सोलापूर शहर आणि परिसरात दुचाकी चोरांचा सुळसुळाट झाला असून दररोज शहरातून तीन- ते चार दुचाकी चोरीला जात आहेत. पोलिस या चोरट्यांना पकडण्यात अपयशी ठरताना दिसत आहेत. रस्ते, घरासमोर उभ्या केलेल्या दुचाकींना चोरट्यांनी लक्ष केले आहे.

शहरात सोमवारी तीन दुचाकी चोरींची पोलिसात नोंद झाली. पहिली घटना ही जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गीता नगर न्यू पाच्छा पेठ येथे घडली. विलास व्यंकव्या चिंता (वय-४९,रा.गीता नगर) यांनी घरासमोर पार्क केलेली दुचाकी(एमएच.१३. एएआर.७६१९) चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना २३ ऑगस्ट रोजी दुपारी घडली. तपास पो. हे.कॉ. कांबळे हे करीत आहेत. तसेच दुसरी घटना ही जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विद्यानगर शेळगी येथे दि.२५ रोजी घडली. वीरुपाक्षप्पा ईरप्पा कोरचगाव (वय-४८,रा.आदित्य नगर) यांची दुचाकी (एमएच.१३.डीजे.४५३३)चोरीला गेली. तपास पो.हे.कॉ. शिवशरण हे करीत आहेत. तर तिसरी घटना फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केगाव येथे घडली. नितीन वसंत इंगळे यांची दुचाकी चोरीला गेली. तपास पो.ना. भद्रशेट्टी हे करीत आहेत. पोलिस एक ते दोन दुचाकी चोर पोलिसांच्या जाळ्यात सापडत आहेत. हे दुचाकी चोर पकडले तरी त्यांचे फरार साथीदार दुचाकी चोरी करत असल्याने पोलिसांची डोकेदुखी वाढत आहे.

# सिंहगडच्या सहा विद्यार्थ्यांची टीई कनेक्टिव्हिटीत निवड

## वार्षिक तीन लाख पॅकेज: कॅम्पस प्लेसमेंटमधून निवड

✔ पंढरपूर/प्रतिनिधी




कोर्टी (ता. पंढरपूर) येथील एस. के. एन. सिंहगड कॉलेज इंजिनिअरिंग महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरींग विभागात अंतिम वर्षात शिक्षण घेत असतानाच ६ विद्यार्थ्यांची टीई कनेक्टिव्हिटी या कंपनीत कॅम्पस प्लेसमेंट मधुन निवड झाली असल्याची माहिती मेकॅनिकल इंजिनिअरींग विभाग प्रमुख डॉ. श्याम कुलकर्णी यांनी दिली.

टीई कनेक्टिव्हिटी ही एक अमेरिकन स्विस-प्रवासी तंत्रज्ञान कंपनी आहे. जी ऑटोमोटिव्ह, औद्योगिक उपकरणे, डेटा कम्युनिकेशन सिस्टम, एरोस्पेस, डिफेन्स, मेडिकल, ऑइल एंड गॅस, कन्ड्युमर इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध उद्योगांमधील कठोर वातावरणासाठी कनेक्टिव्हिटी आणि सेन्सर उत्पादनांची रचना आणि उत्पादन करते. अशा या कंपनीत पंढरपूर सिंहगड अभियांत्रिकी मधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील अविनाश बन्सी रेडे, वैभव सचिन धुमाळ, संकेत सत्यवान फडतरे, संदीप अशोक क्षीरसागर, अदिनाथ लक्ष्मण साळुंखे आणि आशुतोष ज्ञानेश्वर कोरे आदी ६ विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंट मधुन निवड झाली असुन कंपनीकडून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक ३ लाख पॅकेज मिळणार आहे.

टीई कनेक्टिव्हिटी या कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, डॉ. श्याम कुलकर्णी, डॉ. बाळासाहेब गंधारे, डॉ. अल्ताफ मुलाणी, लेसमेंट ऑफिसर प्रा. समीर कटेकर,आदींसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

# ग्रामस्थांची सेवा करण्याची संधी मिळाली हे भाग्यच

## हृदयरोग तज्ञ दिलीप टकले यांनी व्यक्त केली कृतज्ञता

✔ वेळापूर/प्रतिनिधी



**वेळापूर : ॲड. नागेश काकडे यांच्या हस्ते जीवन गौरव सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. राहुल मिले व ग्रामस्थ उपस्थित होते.**

१९८६ पासून तांदुळवाडी व पंचक्रोशीतील ग्रामस्थां ची सेवा करण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य समजतो, आणि आज रोजी तांदुळवाडी ग्रामस्थांच्या वतीने माझा झालेला जीवन गौरव सन्मान ही माझ्या कामाची व केलेल्या सेवेची पोचपावती असल्याचे प्रतिपादन डॉ.दिलीप टकले यांनी केले ते

तांदुळवाडी येथील मिले हॉस्पिटल तांदळवाडी यांच्या १२ व्या वर्धापन दिनानिमित्त व हृदयरोग तज्ञ दिलीप टकले यांचा जीवनगौरव सन्मान सोहळा व महा आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सत्कार सोहळ्याला उत्तर देताना बोलत होते. यावेळी व्यासपीठावर हृदयरोग तज्ञ डॉ. दिलीप टकले, डॉ. मोजेस इंगटी, स्त्रीरोगतज्ञ डॉ. सोनिया फडिया, डॉ. गौरव फले, डॉ. स्वप्नील ढोक, डॉ. विजय खोत, डॉ. नंदकुमार जगताप, डॉ. विजय निलटे, डॉ राजकुमार रणदिवे, डॉ. महामुनी, डॉ. सीमा वाघमोडे, सहकार महर्षी साखर कारखान्याचे संचालक ॲड. विजय पवार, जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य ॲड. नागेशराव काकडे, उपसरपंच सतीश कदम, डॉ. राहुल मिले, श्रद्धा मिले, उपस्थित होते.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्तावि कात डॉ. राहुल मिले म्हणाले की गेली बारा वर्षापासून तांदुळवाडी व परिसरातील ग्रामस्थांची सेवा करण्याचे काम करत आहे. तसेच मिरज येथील तांदुळवाडी सह परिसरातील हजारो रुग्णांना गेली अनेक दशके आपल्या उपचारातून बरे केले आहे असे हृदयरोग तज्ञ डॉ. दिलीप टकले यांचा जीवन गौरव सन्मान सहकार महर्षी साखर कारखान्याचे संचालक ॲड. विजय पवार व जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य ॲड. नागेशराव काकडे यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन करण्यात आला. तसेच मिले हॉस्पिटलच्या नवीन बसवण्यात आलेल्या डिजिटल एक्स-रे मशीनचे उद्घाटन डॉ. दिलीप टकले व सज्जन मिले आणी आशाताई मिले यांच्या हस्ते करण्यात आले.

## संक्षिप्त वृत्त



सोलापूर : विनायक महिंद्रकर यांचा सत्कार करताना बसवराज येरटे, दास शेळके, सुनील रसाळे व इतर.

### सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळा अध्यक्षपदी महिंद्रकर

**सोलापूर** : सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या उत्सव अध्यक्ष पदी विनायक महिंद्रकर यांची तर कार्यवाहपदी आकाश हारकुड व मल्लिनाथ सोलापुरे यांची निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी ट्रस्टी अध्यक्ष बसवराज येरटे होते. या बैठकीस विश्वस्त सुनिल रसाळे, दास शेळके, नरसिंग मेंगजी, संजय शिंदे, श्रीशैल बनशेट्टी, नंदकुमार उपाध्ये, सोमनाथ मेंडके, मल्लिनाथ याळगी आणि पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन विजय पुकाळे यांनी केले तर आभार गौरव जक्कापुरे यांनी मांडले. इतर पदाधिकारी असे उपाध्यक्ष विजयकुमार बिराजदार, महेश मेंगजी, किसन गर्जे, विरेश सक्करगी, चक्रपाणी गज्जम, विश्वनाथ गोयल, चिन्मय पाटील, कार्याध्यक्ष -सोमनाथ शरणार्थी.




सोलापूर : अस्वाक्षरी मोहिमेचा शुभारंभ करताना अस्मिता गायकवाड, पूजा खंदारे व इतर.

### ठाकरे गटाच्या महिला आघाडीने घेतली स्वाक्षरी मोहीम

**सोलापूर** : ठाकरे गटाच्या महिला व युवती आघाडीच्या वतीने सोमवारी जिल्हा परिषदेच्या उपोषण गेट समोर निदर्शने करून स्वाक्षरी मोहीम राबवली. या मोहिमेतून शक्ती कायद्याची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. शिवसेनेच्या उपनेते अस्मिता गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यात युवती आघाडीच्या जिल्हाप्रमुख पूजा खंदारे, रेखा आडकी, सुनंदा माने, सुनिता थोरात, श्रीदेवी बगले, शशिकला चीवडशेट्टी, मंगल थोरात, जोहरा बेन रंगरेज, जयश्री पाटील, मीना सुरवसे, रमा सरवदे, सुनंदा माने, प्रियांका वाघमोडे आदी महिला सहभागी झाल्या होत्या. झोपलेल्या सरकारला जागे करण्यासाठी महिला आघाडीच्या वतीने स्वाक्षरी मोहीम घेतल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

### इलेक्ट्रिक वाहनाच्या धडकेने मजूर महिला जखमी

**सोलापूर** : कारखान्यात काम करीत असताना फोरक्लिप इलेक्ट्रिक चार चाकी वाहनाच्या धडकेने ४२ वर्षीय महिला गंभीर जखमी झाली. हा अपघात शनिवारी दुपारच्या सुमारास चिंचोली एमआयडीसी येथील गुजरात रबर कंपनी येथे घडला. जमुना प्रकाशसिंग काटेवाल (वय ४२ रा. दहिटणे) असे जखमी महिलेचे नाव आहे तिला. उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिने दिलेल्या फिर्यादीवरून कारखान्यातील ड्रायव्हर कदम याच्याविरुद्ध मोहोळच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला. जमुना काटेवाल या शुक्रवारी दुपारी चिंचोली येथील गुजरात रबर कारखान्यात झाडू मारत होत्या. त्यावेळी पाठीमागून फोरक्लिप इलेक्ट्रिक चार चाकी वाहनाच्या धडकेने त्या गंभीर जखमी झाल्या. पायावरून चाक गेल्याने त्यांचे पाय फ्रॅक्चर झाले. अशी नोंद पोलिसात झाली.

### हगलूरजवळ टँकरचे २ टायर पळवले

**सोलापूर** : बॅटरी संपल्यामुळे थांबलेल्या टँकरचे दोन टायर आणि ७० लिटर डिझेल असा ४५ हजाराचा माल चोरट्याने पळविला. ही चोरी हागलुर (ता.दक्षिण सोलापूर) येथील कल्याणी




हॉटेल जवळ शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली. दाविदारो जेसुराज (रा. तामिळनाडू) हा आपला एमएस१०-डीटी-३१०५ ग क्रमांकाचा १६ टायरचा टँकर घेऊन निघाला होता. वाटेत बॅटरी संपल्यामुळे गाडी उभी करून तो हगलूर येथील कल्याणी हॉटेल जवळ गाडीतच झोपला होता. पहाटेच्या सुमारास चोरट्याने टँकरचे २ डिस्क सहित टायर आणि ७० लिटर डिझेल चोरून नेले. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्याने तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. हवालदार गुंड पुढील तपास करीत आहेत.

# ब्रह्मवृंदांच्या वेदघोषात अतिरुद्र स्वाहाकारास प्रारंभ

## बसवारूढ महास्वामीजी मठ ट्रस्टचा उपक्रम

**सोलापूर/प्रतिनिधी**

**ॐ नमस्ते रुद्र मन्यव उतो त इषवे नम:। नमस्ते अस्तु धन्वने बाहुभ्यामुत ते नम: श्श्र असा मंत्रघोष करीत ब्रह्मवृंदांच्या वेदघोषात अतिरुद्र स्वाहाकारास सोमवारी विमानतळापाठीमागे असलेल्या कस्तुरबा नगरातील सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठात प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.**



सोलापूर : बसवारूढ मठामध्ये अतिरुद्र स्वाहाकारास बसलेले भक्तगण.

सोमवारी सकाळी गोपूजन, ध्वजपूजन, मंगलमंत्र पठण, महागणपती पूजन, स्वस्तिपुण्याहवाचन, मातृका पूजन, नांदी श्राद्ध, ऋत्विग् वरण, प्रधान देवता स्थापन, अग्निमंथन, अग्निस्थापना, कुंड संस्कार, नवग्रह होमम् हे विधी करण्यात आले. यानंतर अतिरुद्र स्वाहाकारास आरंभ झाला.

बसवारूढ महास्वामीजी मठाचे संस्थापक श्रो. ब्र. श्री. ईश्वरानंद महास्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत मठाधिपती श्रो. ब्र. श्री. शिवपुत्र महास्वामीजी यांच्यासह मुख्य यजमान ब्रिजमोहन फोफलिया, यजमान माजी महापौर किशोर देशपांडे, स्वागत समिती उपाध्यक्ष सोमनाथ वैद्य, मठाचे विश्वस्त उद्योजक सतीश कुलकर्णी, सुधीर इनामदार यांनी सहकुटुंब अतिरुद्र स्वाहाकार केला. भगवान शंकर आणि श्री पार्वती देवींची मांडलेली पूजा, रुद्राची एकामागून एक होणारी आवर्तने, महिला भाविकांच्या हस्ते कुंकुमार्चन आणि दर्शनासाठी आलेल्या भाविकांची गर्दी यामुळे वातावरण भक्तिमय बनले होते. सायंकाळी शिवपुराण, प्रवचन, अष्टावधान सेवा, मंत्रपुष्प, महामंगलारती करण्यात आली.मंगळवारपासून रविवारपर्यंत दररोज सकाळी ७ ते दुपारी २ वाजेपर्यंत अतिरुद्र स्वाहाकार, सकाळी १० ते १२ कुंकूमार्चन तर दुपारी १२ वाजता दररोज भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. भाविकांनी दररोज या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठाचे संस्थापक श्रो. ब्र. श्री. ईश्वरानंद महास्वामीजी यांनी याप्रसंगी केले.

### पिंपळ अन् शमीच्या लाकडापासून प्रज्वलित केला अग्नी

अतिरुद्र स्वाहाकारानिमित्त अग्निमंथन विधीद्वारे अग्निप्रज्वलित करण्यात आला. यावेळी अग्नी तयार करण्यासाठी काडेपेटीचा वापर न करता वेदकाळापासून चालत आलेल्या पिंपळ आणि शमीच्या लाकडापासून घुसळून अग्नी तयार करण्याच्या पद्धतीनुसार अग्नी प्रज्वलित करण्यात आला. हा विधी पाहण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

## तीर्थला दर्शनाला जाण्यासाठी २५ अर्ज उपलब्ध

**सोलापूर** : सोलापुरातून तीर्थला दर्शनाला जाण्यासाठी २५ अर्ज उपलब्ध झाल्याची माहिती समाज कल्याण सहाय्यक आयुक्त चौगुले यांची दिली. मुख्यमंत्री वयोश्री व तीर्थ दर्शन योजनेचा आढावा घेण्यासाठी जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आली होती. यावेळी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अधिकारी नागनाथ चौगुले यांनी मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत झालेले बदल, लागणारी कागदपत्रे तसेच तीर्थ दर्शन योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी निवडणे याबाबत माहिती दिली. या बैठकीला उपस्थित असलेल्या २५ ज्येष्ठांनी तीर्थ दर्शन योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज नेले आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्येष्ठांची उत्पन्नाची मर्यादा अडीच लाख आहे. तसेच तीर्थाटनला जाण्यासाठी ज्येष्ठांनी आरोग्य तपासणी करून घेणे आवश्यक आहे. वयोश्री योजनेतून ३ हजाराचे अनुदान दिले जाते. यातून ज्येष्ठांना श्रवणयंत्र, वाकर, टॉयलेट खुर्ची खरेदी करता येणार आहे.

# स्वाईन फ्लूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी मोकाट डुकरांचा बंदोबस्त करणार

## महापालिका आरोग्य अधिकाऱ्यांनी दिले पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना पत्र



**सोलापूर** : शहरात स्वाईन फ्लूचा १ रुग्ण आढळल्याने महापालिकेचे आरोग्य खाते सतर्क झाले आहे. डुकरांमुळे स्वाईन फ्लू होत असल्याने या रोगाचा शहरात प्रादुर्भाव टाळण्यासाठी महापालिकेकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

मोकाट डुकरांचा बंदोबस्त करण्यासंदर्भात पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना पत्र दिल्याची माहिती महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिली.

सोलापूर शहरात मोकाट जनावरांची संख्या मोठी आहे. यामध्ये कुत्रे, गुरे-ढोरे, गाढव तसेच डुकरांचा समावेश आहे. या सर्वच जनावरांचा शहरवासियांना मोठा उपद्रव होत आहे. शहरात डेंग्यू, मलेरियाचे रुग्ण सध्या आढळत आहेत. या पार्श्वभूमीवर नुकताच स्वाईन फ्लूचा १ रुग्ण आढळला होता. त्याची दखल घेत महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी महापालिकेच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना पत्र देऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे सूचित केले आहे.

### स्वाईन फ्लूचा कशामुळे होतो?

स्वाईन फ्लू श्वसननलिकेत होणारा संसर्ग आहे. इन्फ्लूएन्झा 'टाईप-ए' च्या 'एच वन एन वन' विषाणूमुळे हा आजार होतो. डुकरांमध्ये या विषाणूचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे डुकरांपासून माणसांना या रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो. या रोगाचे विषाणू नाक, घसा आणि फुफ्फुसातील पेशींना संक्रमित करतो. शरीर दुखणे, थंडी वाजणे, खोकला, डोकेदुखी,घसा खवखवणे,ताप, थकवा, उलट्या आणि अतिसार या रोगाची लक्षणे आहेत.

### या भागात आहे मोकाट डुकरांचा वावर

शहरात शास्त्रीनगर, गुरुनानक चौक, हद्दवाढ भाग , शेळगी,रविवार पेठ परिसरात मोकाट डुकरांचा वावर दिसून येतो. शास्त्रीनगर समोरील महापालिकेच्या कचरा डम्पिंग ग्राउंड मध्ये मोकाट डुकरांची प्रचंड संख्या दिसून येते. हे लक्षात घेता स्वाईन फ्लूचा आजार फैलाव होऊ नये, याबाबत महापालिका आरोग्य विभागाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, या संदर्भात आळा घालण्यासाठी महापालिकेच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना पत्र देण्यात आले आहे.

## आज शरद पवार गटाकडून महायुतीच्या काळ्या कारनाम्याची हंडी


**सोलापूर** : राज्यातील सध्याचे महायुतीचे सरकार अनेक प्रश्नावर अपयशी ठरले आहे असा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने (पवार गट) महायुतीचे काळे कारनामे या विषयावर सोलापुरात मंगळवार, २७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सात रस्ता येथे अनोखी हंडी बांधण्यात येणार आहे, अशी माहिती प्रदेश उपाध्यक्ष ॲड. यु. एन. बेरिया यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राज्यात महिला, लहान मुले असुरक्षित आहेत. शासनाने जाहीर केलेल्या अनेक योजना अस्तित्वातच आल्या नाहीत. राज्यापुढे कर्ज संकट, दुष्काळाकडे दुर्लक्ष, कर्जमाफीचा उडालेला फज्जा, बळीराजाच्या वाढलेल्या आत्महत्या, राज्यातील उद्योग शेजारच्या गुजरातमध्ये पळवून नेणे , आरक्षणाच्या नावाखाली राजकीय पोळी भाजण्याचा प्रकार, बेरोजगारीचे संकट, वाढती गुन्हेगारी, बालकांविरोधातील गुन्हेगारीत वाढ, माता-भगिनीं विरोधात अवमानात्मक वक्तव्य, महिलांवरील गुन्हेगारींचा उच्चांक, वाढता महिला अत्याचार ही माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी ही हंडी उभारण्यात येत असल्याचे बेरिया यांनी स्पष्ट केले. महायुती सरकारच्या विरोधात त्यांनी केलेल्या कारनाम्यानची हंडी सात रस्ता चौकात उभारण्यात येणार आहे. ही निषेधाची हंडी पाहण्यासाठी सोलापूरकरांनी आवर्जून यावे, असे आवाहनही बेरिया यांनी केले. या पत्रकार परिषदेस भारत जाधव, सुनील इंगळे, प्रशांत बाबर , चंद्रकांत पवार, अल्लाबक्ष मणियार, अ.रजाक मकानदार, सूर्यकांत शेरखाने आदी उपस्थित होते.

### रानभाजी महोत्सवाचे ३१ ऑगस्टला आयोजन

**सोलापूर** : उत्पादक ते ग्राहक अशी विक्री साखळी व्यवस्था बळकट करण्यासाठी कृषि विभाग व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आत्माच्या प्रकल्प संचालकांनी दिली.

या महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रकांत पाटील व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते होणार आहे. शेतकऱ्यांनी रानभाज्या प्रदर्शन व विक्रीसाठी महोत्सवात आणाव्यात, शहर व नजीकचे नागरीक व ग्राहकांनी या महोत्सवास भेट द्यावी तसेच रानभाज्यांची खरेदी करावी. तसेच आरोग्यदायी रानभाजी महोत्सवाचा शेतकऱ्यांनी व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कृषि व आत्मा विभागामार्फत करण्यात आले आहे.



सोलापूर : रिपाइंचे (आठवले गट) महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांचा वाढदिवस सोमवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी युवानेते सुशील सरवदे, दावला(शेठजी) सुर्वे, शिवम सोनकांबळे, राजाभाऊ इंगळे आदी कार्यकर्त्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

### इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : अक्कलकोट रोडवरील साई नगरात राहणाऱ्या सुरेश लक्ष्मण राठोड (वय ३६) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

ही घटना सोमवारी पहाटे दीड सुमारास उघडकीस आली. सुरेश राठोड हा साईनगर येथील मोहसीन शेख यांच्या घरात भाड्याने होता. आज पहाटेच्या सुमारास त्याचा मृतदेह छताच्या पंख्याला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

# राज्यस्तरीय व्यापार बंदला तात्पुरता स्थगिती : गांधी

## बाजार समिती, जी.एस.टी व अन्य विषयांवर समिती गठीत

**सोलापूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या वतीने २७ ऑगस्ट २०२४ रोजी पुकारलेला एक दिवसीय व्यापार बंद तात्पुरता स्थगित करण्यात आल्याची माहिती कृती समिती अध्यक्ष ललीत गांधी यांनी दिली. यावेळी बाजार समिती विषयासाठी तसेच जी.एस.टी व अन्य विषयासाठी कृती समिती गठीत करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

राज्यस्तरीय कृती समितीच्या बंदची व्याप्ती लक्षात घेऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीमध्ये कौशल्यविकास मंत्री मंगलप्रभातजी लोढा, आमदार माधुरी मिसाळ, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती अडत व भुसार व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सुरेश चिकळळी. पणन, वित्त सहकार- नगरविकास विभागाचे मुख्य सचिव, पणन संचालक व विविध विभागातील अधिकारी वर्ग उपस्थित होते. ललीत गांधी, कृती समितीचे समन्वयक राजेंद्र बाठिया व दि पूना मर्चेंट्स चेंबर अध्यक्ष रायकुमार नहार, फॅमचे अध्यक्ष जितेंद्र शहा, मोहन गुरनानी, दिपेन अगरवाल व भिमजी भानुशाली यांनी चर्चेमध्ये भाग घेतला.या बैठकीपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ललीत गांधी यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा करुन व्यापाऱ्यांच्या प्रश्नावर सरकार सकारात्मक असल्याची ग्वाही दिली. त्यानंतर कृती समितीने चर्चा करुन २७ तारखेचा एक दिवसीय राज्यव्यापी बंद तात्पुरता स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

यावेळी उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, फॅमचे सचिव प्रितेश शहा, ग्रोमाचे सचिव नितेश विरा, दि पूना मर्चेंट्स् चेंबरचे माजी अध्यक्ष प्रवीण चोरबेले,सोलापूर अडत व भुसार व्यपरी संघटनेचे अध्यक्ष सुरेश चिकळळी, अनिल भन्साळी उपस्थित होते .आभार- ग्रोमाचे अध्यक्ष भिमजी भानुशाली यांनी मानले.



मुंबई : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करताना ललित गांधी, राजेंद्र बाटिया, भीमजी भानूशाली आदी.

### समितीला ३० दिवसांमध्ये निर्णय घेण्याचे निर्देश

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाजार समिती विषयासाठी तसेच जी.एस.टी व अन्य विषयासाठी कृती समिती सदस्य व मुख्यसचिव व अन्य अधिकारी वर्गाची उच्चस्तरीय समिती गठित करण्याचे आदेश दिले. समितीने ३० दिवसांमध्ये योग्य निर्णय घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

# सत्ताधाऱ्यांमुळे देशात वातावरण विकृत होत आहे

## काँग्रेसच्या खा. प्रणिती शिंदे यांचा आरोप



**सोलापूर/प्रतिनिधी**

पुरोगामी महाराष्ट्रात मुली सुरक्षित नाहीत. देशात विकृत मानसिकता सत्ताधाऱ्यांमुळे निर्माण होत आहे. ती शोकांतिका आहे. प्रशासन व शासन महिलांना साथ देत नाही असा आरोप करत समाजानेच आता पुढाकार घेऊन क्रांती घडवली पाहिजे, अशी भूमिका काँग्रेसच्या खा. प्रणिती शिंदे यांनी मांडली.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघात एका कार्यक्रमानिमित्त आल्या असताना पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी विविध विषयांवर आपली भूमिका स्पष्ट केली. ब्रिजभूषण सारख्यांना पाठीशी घातले जाते म्हणून महिला अत्याचाराच्या प्रमाणात वाढ होते. गुजरातमध्ये बलात्काऱ्यांचे सत्कार होतात आणि गुन्ह्यांची दखल घेतली जात नाही. ही गंभीर बाब आहे. आम्ही काहीही केले तरी सत्ताधारी कारवाई करत नाहीत हे अन्याय करणाऱ्यांना माहीत आहे. अन्याय करणाऱ्यांना सत्ताधारी साथ देतात.समाज जर चार वर्षाच्या मुलीला सोडत नसेल तर आपण कुठे नरकात चाललो आहोत का? असा प्रश्न खा. शिंदे यांनी उपस्थित केला.

स्त्री जन्माच्या आपण स्वागत करतो साजरा करतो. पुढे जाऊन महिलांचा अपमान होतो. यातूनच कदाचित स्त्रीभ्रूणहत्या करण्याची मानसिकता होते का म्हणूनच समाजात मुली नको अशी मानसिकता ठेवून आपण मागे चाललो आहोत का? राजमाता जिजाऊ, राजमाता अहिल्यादेवी, माता रमाई, क्रांतीज्योती सावित्री यांच्या महाराष्ट्रात आपण पुढे जात आहोत की मागे जात आहोत, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

### खा. शिंदे यांचे पालकांना आवाहन

खासदार म्हणून नाही तर एक बहीण म्हणून तुम्हाला विनंती करते मुलांसोबत एक तास भर बसा.महिलांचा सन्मान करायला त्यांना शिकवा. महिलांनीच स्वसंरक्षणाचे धडे का शिकावेत ? मुलांना जर संस्कार योग्य शिकवले तर स्त्रियांना सेल्फ डिफेन्सची गरज नाही. कोणतेही खासदार, आमदार तुमच्या घरी येऊन मुलांना शिकवू शकणार नाहीत. पालकांनीच आपल्या मुलांना शिकवावे लागेल, असे आवाहन खा. शिंदे यांनी केले.